नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक २०५ * * अकोला * | बुधवार, दिनांक २८ जानेवारी २०२६ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## यूजीसीच्या नवीन नियमांचा देशभरात विरोध

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २७ :
देशभरात जनरल कॅटेगरीतील विद्यार्थी आणि सवर्ण जातीच्या लोकांचा विद्यापीठ अनुदान आयोगच्या नवीन नियमांना घेऊन विरोध तीव्र झाला आहे. नवी दिल्लीत युजीसी मुख्यालयाबाहेर सुरक्षा वाढवण्यात आली आहे. आंदोलकांना कॅम्पसमध्ये घुसण्यापासून रोखण्यासाठी मोठ्या संख्येने बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत.

उत्तर प्रदेशात विद्यार्थी, तरुण आणि विविध संघटनांनी जागोजागी निदर्शनांमध्ये भाग घेतला. रायबरेलीमध्ये भाजप किसान नेते रमेश बहादूर सिंह आणि गौरक्षा दलाचे अध्यक्ष महेंद्र पांडे यांनी सवर्ण खासदारांना बांगड्या पाठवल्या आहेत.

## भिडे की शेणातील किडे

आग्राग्र लेख
खरीखरी..
श्रीकृष्ण चांडक



महाराष्ट्रात संभाजी भिडे नावाचा एक द्विपाद प्राणी आहे. या माणसाला साधी सभ्यता पाळण्याचीही अक्कल दिसत नाही. विषारी गरळ ओकणे हा या माणसाचा स्थायीभाव आहे. काल या माणसाने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तसेच देशाचे माजी केंद्रीय मंत्री आणि महाराष्ट्राचे नेते शरद पवार यांच्यावर घाणेरड्या भाषेत हल्ला चढविला. एखाद्याशी आपले वैचारिक किंवा राजकीय वैर असले तरी सभ्य माणूस आपली जीभ घसरू देत नाही. पण या नकली संभाजीला महाराष्ट्रात आणि संपूर्ण राज्यात सौहार्दाचे परस्पर संबंध राहावेत असे वाटतच नाही. शरद पवार यांच्या राजकीय कारकीर्दीवर आणि त्यांच्यावर टिप्पणी करताना या द्विपाद प्राण्याने जी भाषा वापरलेली आहे ती आम्हाला लिहीताही येत नाही. भाषण करताना जे लोक उपस्थित होते ते त्यांचे वैरीही नव्हते आणि भक्तही नव्हते. तरीही ते शब्द ऐकून उपस्थित आश्चर्यचकित झाले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटातून संतप्त प्रतिक्रिया येणे स्वाभाविक आहे आणि साहजिकही आहे. परंतु जन-सामान्यांनाही या भिड्यांचे वादग्रस्त वक्तव्य मनाला भिडलेले नाही. उलट ही या माणसाची विकृती आहे असेच सर्वत्र चर्चिले जात आहे आणि सर्वांच्याच बोलण्यात येत आहे. या माणसाची मुक्ताफळे आठवली म्हणजे तळपायाची आग मस्तकात जाते. आपल्या बागेतील आंबा खाल्ला की मुले होतात, असा भिडेशोध यांनी लावला होता आणि आपण ऐकला होता. महात्मा गांधीजींची नालस्ती करणे हा या भिडभिड्याचा जुना छंद आहे. महात्मा गांधीजींच्या पायाच्या नखाचीही बरोबरी करू न शकणारा हा थेरडा जो काही आरडाओरडा करतो. त्याबद्दल त्याची वेड्याच्या इस्पितळात रवानगी करावी, असे अनेक सामान्य जन म्हणतात. या भिड्यांना राहून राहून वादग्रस्त विधाने करण्याची सवयच आहे. अशा या भिड्याला २४ तासांच्या आत अटक झाली नाही आणि गुन्हा दाखल केला नाही तर महाराष्ट्र बंद करण्याचा इशारा देण्यात आलेला आहे. महाराष्ट्रात प्रत्येकाला बोलण्याचा, आपली मते मांडण्याचा अधिकार आहे. मात्र कमरेखालचे बोलणे आणि असभ्य शब्दांचा उपयोग करणे ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. राजकारणात आणि समाजकारणात विचारांचे मतभेद असतातच. या वैचारिक मतभेदाला महाराष्ट्राने कधीही नाकारले नाही किंबहुना सभ्य वाद विवादसाठी महाराष्ट्र प्रसिद्ध आहे. मात्र भिडे यांना म्हातारचळ लागले आहे असे जर म्हटले तर ते अजिबात वावगे होणार नाही. या नकली संभाजीच्या मेंदूत कोणकोणते किडे वळवळत आहेत हे त्याचाही तपास करणे आता गरजेचे झालेले आहे. या क्षुद्र माणसाला विनाकारण भाव देणेही बरोबर नाही. या भिड्याने ज्या पद्धतीने बेअकली तारे तोडलेले आहेत त्याला महाराष्ट्र कधीच क्षमा करू शकत नाही. महाराष्ट्राच्या इभ्रतीला आणि वैचारिकतेला जराही समजू न शकणाऱ्या या नकली संभाजीला कितीही टोचले, तरी हा माणूस आपल्या पोटातील विषवल्ली त्याच्या घाणेरड्या तोंडातून बाहेर टाकणारच आहे. महाराष्ट्राने अशा प्रकारचा उद्दामपणा कधीच सहन केला नाही. भल्याभल्यांना महाराष्ट्राने आपले महातेज दाखवलेले आहे. या माणसाला इतकी गटारी भाषा कशी बोलता येते तेच आम्हाला कळत नाही. बरं, या दगडाचा निषेध तरी कसा करावा? कारण या दगडावर डोके आपटले तरी डोके फुटून आपलेच रक्त वाहून जाईल. त्यामुळे महाराष्ट्राच्या जनतेने आपले कान बंद करावे आणि अधिक शब्दच्छल न करता या भिड्यांना शाब्दिक जोडे मारण्याकरिता विनाकारण आपला वेळ खर्ची करू नये, हेच बरे!

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

## नागपूर ते गोंदिया आणि भंडारा ते गडचिरोली
# समृद्धी महामार्गाचा विस्तार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळ आणि पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत राज्याच्या विकासाला गती देणारे अनेक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले. यामध्ये मुंबई आणि नवी मुंबई या दोन्ही आंतरराष्ट्रीय विमानतळांना जोडणाऱ्या 'मेट्रो मार्ग ८' ला अधिकृत मान्यता देण्यात आली असून, नाशिक शहर परिक्रमा मार्ग, समृद्धी महामार्गाचा विस्तार, आयटीआयमध्ये 'पीएम सेतू' योजना राबवण्यासह मंत्रिमंडळात ५ मोठे निर्णय घेण्यात आलेत.

नागपूर-गोंदिया आणि भंडारा-गडचिरोली या समृद्धी महामार्गाच्या विस्तारित कामांना गती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विदर्भाच्या विकासासाठी हे मार्ग महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील खनिज वाहतुकीसाठी नवेगाव मोरे ते सुरजागड या ८५.७६ किमी लांबीच्या महामार्गाचे चार पदरी सिमेंट काँक्रिटीकरण केले जाणार आहे.

नागपूर ते मुंबईपर्यंत असलेल्या या समृद्धी महामार्गाच्या विस्तारीकरणात आता हा मार्ग नागपूर ते गोंदिया आणि भंडारा ते गडचिरोली असा विस्तारणार असून, आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहर परिक्रमा मागार्ला गती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मागार्ची एकूण लांबी ६६.१५ किलोमीटर आहे. या प्रकल्पासाठी एकूण ३९५४ कोटीच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळ यांदरम्यान प्रवासाचा वेळ वाचवण्यासाठी 'मेट्रो ८' प्रकल्प राबवला जाणार आहे. ३५ किमी लांबीच्या या मार्गात एकूण २० स्थानके असतील. त्यापैकी ६ स्थानके भूमिगत तर १४ स्थानके उन्नत असतील. या प्रकल्पासाठी २२ हजार ८६२ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. पुढील ६ महिन्यांत भूसंपादन पूर्ण करून येत्या ३ वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत.



आयटीआयमध्ये 'पीएम सेतू' योजना (रोजगार व कौशल्य विकास) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये आता 'पीएम सेतू' योजना राबवली जाणार आहे. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होणार आहेत. पहिल्या टप्प्यात नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे जिल्ह्यातील संस्थांमध्ये ही योजना सुरू होईल. त्यानंतर टप्प्याटप्प्याने राज्यभर विस्तार केला जाईल.

सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योजक आणि कंत्राटदारांची प्रलंबित देयके वेळेवर अदा करण्यासाठी 'ट्रेड्स प्लॅटफॉर्म' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे कंत्राटदारांची आर्थिक कोंडी दूर होणार आहे.

धुळे येथील 'जवाहर शेतकरी सहकारी सूतगिरणी'चे पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यासाठी राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांच्याकडे शिफारस करण्यात येणार असून, शेतकरी आणि कामगारांना मोठा आधार मिळणार आहे.

विविध कारणांसाठी देण्यात येणाऱ्या शासकीय जमिनींच्या भाडेपट्ट्याचा कालावधी वाढवून देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. विशेषतः महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि १९७१ च्या नियमांनुसार जे पट्टे ३० वर्षांसाठी दिले जातात, त्यांच्या कालावधीत वाढ करण्यात येणार आहे.

शासनाच्या ताब्यात असलेल्या 'शत्रू संपत्ती'च्या खरेदी-विक्री व्यवहारांसाठी आता मुद्रांक शुल्क माफ करण्यात येणार आहे.

## काँग्रेस, ठाकरे गट अडीच-अडीच वर्षे
### चंद्रपुर मनपातील सत्तेचा तिढा सुटला

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर / मुंबई, दि. २३ :
काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली.



या भेटीत त्यांनी चंद्रपूर महापालिकेत सत्ता स्थापन करण्याच्या मुद्यावर ठाकरेंशी चर्चा केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना वडेट्टीवारांनी ही चर्चा सकारात्मक झाल्याचे सांगितल्यामुळे चंद्रपुरात सत्ता स्थापन करण्याचा तिढा सुटल्याचे मानले जात आहे.

चंद्रपूर महापालिका निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. त्यामुळे येते सत्ता स्थापनेचा मोठा पेच निर्माण झाला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रयत्नांतर्गत मंगळवारी ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी चंद्रपूर महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी ठाकरे गटाची मदत मागितली. त्यावर ठाकरेंनी महापौर पद व स्थायी समितीचे अध्यक्षपद प्रत्येकी अडीच वर्ष वाटून घेण्याच्या अटीवर काँग्रेसला पाठिंबा देण्याचे स्पष्ट केले.

उद्धव ठाकरे यांच्या भेटीनंतर विजय वडेट्टीवार पत्रकारांशी बोलताना म्हणाले, चंद्रपूर महापालिकेत महाविकास आघाडीची सत्ता स्थापन करण्यासंदर्भात मी आज उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. आमच्यात जवळपास अर्धा तास चर्चा झाली. आमच्या प्रस्तावाला ठाकरेंनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला. चंद्रपूरमध्ये महाविकास आघाडीची सत्ता स्थापन व्हावी अशी त्यांची १०० टक्के इच्छा आहे. त्यांनी आमच्यापुढे एक प्रस्ताव ठेवला आहे. महापौर पद हे अडीच-अडीच वर्षांसाठी होत असेल तर तशी तयारी केली पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. याशिवाय स्थायी समिती सुद्धा अडीच-अडीच वर्षांसाठी दोन्ही पक्षांना मिळायला हवी असे ते म्हणालेत. या प्रकरणी आमच्या प्रदेशाध्यक्षांशी चर्चा करून आमचा निर्णय मी त्यांच्या कानावर घालेन. या प्रकरणी काही अडचण येईल असे मला वाटत नाही. कारण, राज्यात महाविकास आघाडी म्हणून आम्ही लोकसभा व विधानसभेची निवडणूक लढवली. त्यामुळे चंद्रपूरमध्येही एकत्र आलो तर आम्हाला अधिक मजबुतीने काम करता येईल. खुर्चीवर बसणाऱ्यांनाही चांगल्या पद्धतीने काम करता येते, असे वडेट्टीवार म्हणाले.

## शिवसेना खटल्याची सुनावणी आता झेडपी निवडणुकीनंतर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २७ :
महाराष्ट्रासह अवघ्या देशाचे लक्ष लागलेल्या शिवसेना पक्ष व धनुष्यबाण प्रकरणाच्या सुनावणीसाठी आता सर्वोच्च न्यायालयाने आता १८ फेब्रुवारी ही नवी तारीख दिली आहे. त्यामुळे आता या प्रकरणावर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीनंतरच सुनावणी होईल हे स्पष्ट झाले आहे.




सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वातील खंडपीठाने शिवसेनेची सुनावणी २१ व २२ जानेवारी रोजी सलग २ दिवस घेण्याचे निश्चित केले होते. पण २१ तारखेला सुप्रीम कोर्टाने ऐनवेळी अरावली पर्वताचे प्रकरण हातावर घेतल्यामुळे या प्रकरणी सुनावणी होऊ शकली नाही. त्या दिवशी या प्रकरणाची सुनावणी २३ जानेवारी रोजी होईल असे सांगण्यात येत होते. पण त्या दिवशीही हे प्रकरण बोर्डावर आले नाही.

अखेर आज सुप्रीम कोर्टाने हे प्रकरण १८ फेब्रुवारी रोजी सुनावणीसाठी हाती घेतले जाईल हे स्पष्ट केले आहे. सुप्रीम कोर्टाच्या संकेतस्थळावर ही तारीख नमूद करण्यात आली आहे.

## लवकरच लागू होणार 'सातारा गॅझेटियर'

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २७ :
मंत्रालयात झालेल्या मराठा आरक्षण उपसमितीच्या बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला आहे.



उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात आजच्या बैठकीत सातारा गॅझेटियरवर प्रामुख्याने चर्चा झाली. हैदराबाद गॅझेटियर अंमलबजावणी आणि मराठा आरक्षण विषयावर आढावा घेण्यात आला.

त्यानुसार, राज्यातील जिल्हा परिषद निवडणुकीनंतर सातारा गॅझेटियर लागू करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. आजच्या बैठकीनंतर, फक्त इंटरप्रिटेशनचा भाग असल्याने या संदर्भात देखील लवकरच निर्णय होणार असून मराठा आरक्षणासंदर्भात सातारा गॅझेट लागू करण्यासंदर्भात हालचाली सुरू झाल्या असल्याचे समजते.

## ट्यूशनला जाणाऱ्या २ मुलींना विहिरीत फेकले

■ वृत्तसंस्था, जळगाव, दि. २७ :
एका माथेफिरू तरुणाने खासगी शिकवणीला जाणाऱ्या २ अल्पवयीन विद्यार्थिनींना विहिरीत फेकून दिल्याची घटना भुसावळ तालुक्यात घडली.

रोहन चौधरी असे आरोपी माथेफिरू तरुणाचे नाव आहे. पीडित मुली इयत्ता ९ वीच्या विद्यार्थिनी आहेत. त्या मंगळवारी सकाळी नेहमीप्रमाणे गावातून खासगी शिकवणीसाठी जात होत्या. एका शेतालगत पोहोचल्या असता तिथे दबा धरून बसलेल्या आरोपीने या दोघींवर हल्ला केला. त्याने त्यांना पकडून एका विहिरीजवळ नेले. त्यानंतर त्यांना पकडून विहिरीत फेकून दिले. हा प्रकार घडत असताना मुलींनी जिवाच्या आकांताने आरडाओरडा केला.

गावकऱ्यांनी शिडीच्या मदतीने विहिरीबाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू केला. रात्रीपर्यंत त्यांचा प्रयत्न सुरू होता. आरोपीला अटक झाली आहे.

## भारत - ईयु दरम्यान १८ वर्षांनी ट्रेड डील

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २७ :
भारत आणि युरोपियन युनियनमध्ये मुक्त व्यापार कराराची घोषणा करण्यात आली आहे.

युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो लुईस सँटोस दा कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उसुर्ला वॉन डेर लेयन यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली झालेल्या १६ व्या भारत-ईयू शिखर परिषदेदरम्यान ही घोषणा करण्यात आली.



दोन्ही नेते सध्या भारताच्या अधिकृत दौऱ्यावर आहेत आणि ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून सहभागी झाले होते. या करारामुळे व्यापार, सुरक्षा आणि स्वच्छ ऊर्जा यासारख्या क्षेत्रात सहकार्य बळकट होईल.

मंगळवारी एका कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी घोषणा केली की भारत आणि युरोपियन युनियनमध्ये मुक्त व्यापार करारावर सहमती झाली आहे. जगभरात त्याची सर्व करारांची जननी म्हणून चर्चा होत आहे. दरम्यान, अमेरिकेने या व्यापार करारावर नाराजी व्यक्त केली आहे. अर्थमंत्री स्कॉट बेसंट म्हणाले की युरोप स्वतःविरुद्धच्या युद्धाला निधी देत आहे.

## आईने चिरला पोटच्या मुलाचा गळा, मुलीवरही वार

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २७ :
पुण्याच्या वाघोली परिसरात एका महिलेने आपल्या पोटच्या मुलाची चाकूने गळा कापून हत्या केल्याची भयंकर घटना उजेडात आली आहे. या घटनेत एक ११ वर्षीय मुलगा ठार झाला असून, त्याची बहीण गंभीर जखमी झाली आहे. कौटुंबीक वादातून महिलेने हे कृत्य केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिस पुढील तपास करत आहेत.

सोनी संतोष जायभाय असे आरोपी मातेचे नाव आहे. तर साईराज संतोष जायभाय (११) हे मृत मुलाचे नाव असून, धनश्री संतोष जायभाय (१३) असे जखमी मुलीचे नाव आहे. तिच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तिथे तिची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. जायभाय कुटुंब मूळचे नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील आहे. ते सध्या नोकरी निमित्त वाघोलीतील बाईफ रोड परिसरात वास्तव्यास आहे. आरोपी महिलेचा पती मंगळवारी सकाळी कामानिमित्त बाहेर गेला होता. त्यावेळी तिने संधी साधून आपल्या मुलांवर चाकूने हल्ला चढवला.

## मतदानापूर्वीच महायुतीचा गुलाल
### २२ उमेदवार बिनविरोध

■ वृत्तसंस्था, सिंधुदुर्ग, दि. २७ :
राज्यातील १५ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज अंतिम दिवस होता. या प्रक्रियेनंतर आता निवडणुकीच्या रिंगणातील अंतिम लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे.

दुसरीकडे, प्रत्यक्ष मतदानापूर्वीच महायुतीने कोकणात जोरदार मुसंडी मारत विजयाचे खाते उघडले आहे. तळकोकणात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या तब्बल २२ जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यामुळे मतदानापूर्वीच महायुतीचा गुलाल उधळल्याचे दिसून येत आहे.

# आंतरजातीय विवाहातून तरुणाची हत्या

### सैराटची पुनरावृत्ती
### सासू आणि साळ्यासह पाच जणांना अटक

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २७ :
आंतरधर्मीय विवाह केला म्हणून सासू आणि साळ्याने जावयाला संपवण्याचा कट रचला. गावातील तीन तरुणांच्या मदतीने स्वतःच्याच जावयाची हत्या केल्याची घटना समोर आली आहे. मोहाडी तालुक्याच्या बेटाळा येथे २५ वर्षीय तरुणाच्या हत्येने सैराटची पुनरावृत्ती झाल्याचे समोर आले. आकाश शेंडे असे या मृत तरुणाचे नाव असून, ही हत्या आंतरजातीय प्रेमविवाहाच्या रागातून झाल्याचे समोर आले आहे.

आंतरजातीय विवाहातून बेटाळा येथे घडलेल्या ऑनरकिलींगच्या घटनेनं जिल्हा सुन्न झाला आहे. प्रकरण असे की, आकाश शेंडे या तरुणाचे गावातीलच एका तरुणीसोबत प्रेम संबंध होते. दोघांनाही लग्न करायचे होते मात्र त्यांची जात त्यांच्या लग्नात अडथळा निर्माण करत होती. इतर जातीत लग्न करून देण्यासाठी तरुणीचे कुटुंबीय तयार नव्हते. मात्र कुटुंबीयांच्या विरोधात जाऊन ६ जानेवारी रोजी दोघांनी प्रेमविवाह केला.

तरुणीने उचललेले पाऊल कुटुंबीयांसाठी धक्कादायक होते. त्यामुळे या लग्नाच्या विरोधात असलेल्या कुटुंबीयांनी नवविवाहित जावयाला कायमचे संपवण्याचा कट रचला.

तरुणीची आई अंजू आणि भाऊ चेतन कुंभलकर या दोघांनी गावातील भारत बाळकृष्ण मोहतुरे याला जावयाच्या हत्येची सुपारी दिली. या सुपारीबाज भारत मोहतुरे याने गावातीलच महेंद्र बकाराम बोरकर आणि दिनेश उर्फ सचिन ईश्वरकर या दोघांना हाताशी घेतले.

आरोपी भारत मोहतुरे याने रविवार २५ जानेवारी रोजी आकाश शेंडे याला घरी बोलावले. आकाश त्यांच्या घरी भेटण्यासाठी गेला पुन्हा घरी परतलाच नाही. उशिरापर्यंत आकाश घरी न आल्यामुळे कुटुंबीयांनी त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. अखेर २६ जानेवारी रोजी संपूर्ण गाव प्रजासत्ताक दिनाचा आनंद घेत असतानाच छिन्न आकाशचा मृतदेह विच्छिन्न अवस्थेत घटनास्थळी आढळला. शरीरावरील जखमांचे स्वरूप पाहता, ही हत्या अत्यंत क्रूरपणे आणि नियोजनबद्ध रितीने केल्याचे दिसून आले.


मृतक आकाश शेंडे

घटनेची माहिती मिळताच मोहाडी पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठून मृतदेह ताब्यात घेतला. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आणि पाच आरोपींना अटक केली.

आरोपींमध्ये तरुणीची आई अंजू रमेश कुंभलकर, भाऊ चेतन रमेश कुंभलकर, भारत कुंभलकर (२७), महेंद्र बकाराम बोरकर (३१) दिनेश उर्फ सचिन मोहन ईश्वरकर (३७) या पाच जणांचा समावेश असून, पोलिसांनी त्यांना अटक केली आहे. मोहाडी पोलीस ठाण्यात त्यांच्याविरोधात कलम १०३ (१), ३ (५) भा.न्या.स अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

लग्नानंतर अवघ्या २० दिवसात नववधूचे कुंकू पुसले गेले. आंतरजातीय विवाह, बुरसटलेली मानसिकता आणि जातीय विषमतेने या दोघांच्या संसाराची राख रांगोळी केली. या घटनेनंतर बेटाळा गावात संतापाचे वातावरण निर्माण झाल्यामुळे पोलिसांनी बंदोबस्त तैनात केला होता. पोलीस निरीक्षक सुरेंद्र बेलतोडे तसेच पोलीस उपनिरीक्षक राहुल चौधरी या प्रकरणाचा तपास करीत आहेत.



# महावितरणचा अन्नदाता ते ऊजार्दाता चित्ररथ ठरला संचलनाचे आकर्षण

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २७ :
प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे आयोजित ध्वजवंदन व संचलनाच्या शासकीय कार्यक्रमात महावितरणचा चित्ररथ आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. मुख्यमंत्री तथा ऊजामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अन्नदाता ते ऊजार्दाता या संकल्पनेवर आधारीत महावितरणच्या या चित्ररथाचे कौतुक केले आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात सौर ऊर्जेला चालना देण्यासाठी व शेतकऱ्यांना शाश्वत व मोफत वीज उपलब्ध करून देण्यासाठी अन्नदाता ते ऊर्जदाता ही संकल्पना राबवली आहे. मुख्यमंत्री व ऊजामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागेल त्याला सौर कृषी पंप योजना व मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीतून राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज उपलब्ध करून देत या संकल्पनेच्या पुर्ततेला मोठी गती दिली आहे. या योजनांमधून राज्यातील ४५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रजासत्ताक आयोजित कार्यक्रमात चित्ररथाच्या माध्यमातून महावितरणने केवळ तंत्रज्ञान नव्हे, तर पर्यावरणाभिमुख व समृद्ध महाराष्ट्राचे चित्र मांडले आहे. देशातील पहिले सौरग्राम ठरलेल्या सातारा जिल्ह्यातील मान्याची वाडीचा देखावा चित्ररथात लक्षवेधक ठरला. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत १६ हजार मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प प्रस्तावित असून आत्तापर्यंत ३ हजार ३०० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प पूर्ण झाले आहेत. यातून ८ लाख शेतकऱ्यांच्या ४० लाख एकर शेतीला दिवसा व शाश्वत वीजपुरवठा सुरू आहे. तर मागेल त्याला सौर कृषी पंप योजने अंतर्गत ११ लाख शेतकऱ्यांना सौर कृषी पंप देण्याचे उद्दिष्ट मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत एकाच महिन्यात ४५ हजार ९११ शेतकऱ्यांना सौर कृषिपंप बसवण्याचा विश्वविक्रम गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदवला गेला आहे. याशिवाय प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या माध्यमातून आत्तापर्यंत ४ लाख २५ हजार घरगुती ग्राहकही विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण व स्वावलंबी झाले आहेत.




## अनावधानाने चूक, तर अनावधानाने मंत्रिपदही काढून टाका : प्रकाश आंबेडकर



■ पुणे : प्रजासत्ताक दिनाच्या शासकीय कार्यक्रमात नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी त्यांच्या भाषणात संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख टाळल्याने चांगलेच वातावरण तापले आहे. वाद चिघळल्यानंतर गिरीश महाजन यांनी आपण अनावधानाने नाव घ्यायचे विसरलो, असे स्पष्टीकरण दिले. आता यावर प्रतिक्रिया देताना वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी गिरीश महाजन यांची थेट मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे. अनावधानाने नाव घ्यायचे विसरलात, तर अनावधानाने मंत्रिपदही काढून टाकण्यात यावे, अशी टीका आंबेडकरांनी केली आहे. गिरीश महाजन यांनी दिलेल्या स्पष्टीकरणावर बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, ज्या संविधानामुळे तुम्ही मंत्री झालात, ते संविधान कोणी लिहिले हेच जर तुम्हाला माहिती नसेल, त्यांचे नाव तुम्हाला घेता येत नसेल तर तुम्हाला पदावर राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही, अशी टीका करत आंबेडकरांनी पदाचा राजीनामा देण्याची मागणी केली आहे. पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर देखील निशाणा साधला आहे. ते म्हणाले, आरएसएस नेहमीच दुतोंडी भूमिका घेते. एकीकडे आम्ही बाबासाहेबांना मानतो असे म्हणायचे आणि दुसरीकडे त्यांच्या विचारांच्या विरोधात कृती करायची. हिंदू कोड बिलाला सर्वात आधी विरोध कोणी केला असेल तर तो आरएसएसनेच केला होता. मनुस्मृतीने महिलांना हिंदू धर्मात कोणताही अधिकार दिला नव्हता, ना मालमत्तेचा, ना वैयक्तिक, ना स्वतःच्या शरीराचा. हे सर्व अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून दिले. त्यामुळेच आज एक महिला अधिकारी (माधवी जाधव) जाब विचारण्यासाठी पुढे आली, असे आंबेडकर म्हणाले. गिरीश महाजन यांनी आपण अनावधानाने नाव घ्यायचे विसरल्याचे म्हटले होते, यावर प्रकाश आंबेडकर म्हणाले, जर हीह चूक अनावधानाने झाली असेल, तर तुमचे मंत्रिपदही अनावधानाने काढून टाकण्यात यावे.

## निलंग्यात काँग्रेसच्या महिला उमेदवाराचे अपहरण



■ वृत्तसंस्था, लातूर, दि. २७ :
लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यात जिल्हा परिषद निवडणुकीच्या एका महिला उमेदवाराचे अपहरण झाल्याची घटना उजेडात आली आहे. आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. त्यातच ही घटना घडल्यामुळे राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ माजली आहे. काँग्रेसने या प्रकरणी सत्ताधारी भाजपला जबाबदार धरले आहे.

लातूर जिल्ह्यात सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. सर्वच राजकीय पक्षांनी आपापल्या प्रचाराला सुरुवात केली आहे. या प्रकरणी राजकीय चिखलफेकीला जोर चढला असतानाच काँग्रेसच्या लातूर जिल्ह्यातील एका महिला उमेदवाराचे अपहरण झाल्याची घटना समोर आली आहे. अंजना सुनील चौधरी असे अपहरण झालेल्या काँग्रेसच्या महिला उमेदवाराचे नाव आहे. त्या निलंगा तालुक्यातील व औसा व विधानसभा मतदारसंघातील तांबाळा जिल्हा परिषद गटातून काँग्रेसच्या तिकीटावर निवडणुकीच्या मैदानात उतरल्या होत्या. हा गट अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. त्यांचे 24 जानेवारी रोजी सायंकाळी 5 च्या सुमारास उदगीर येथून अपहरण झाले. यासंबंधीच्या माहितीनुसार, अंजना चौधरी या उदगीर येथील बिदर रोड परिसरातील आपल्या मैत्रिणीकडे हळदी - कुंकवाच्या कार्यक्रमाला गेल्या होत्या. हा कार्यक्रम संपल्यानंतर त्या थेट प्रचाराला जाणार होत्या. त्यानुसार त्यांना घेण्यासाठी काँग्रेसचे स्थानिक नेते रणजीत कोकणे तिथे पोहोचले होते. पण रणजीत कोकणे काही कारणास्तव बाहेर गेले असता, काही गुंडांनी अंजना यांना जबरदस्तीने आपल्या गाडीत घालून पळवून नेले. या घटनेनंतर काँग्रेसने भाजपविरोधात अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी या घटनेसाठी भाजपला जबाबदार धरले आहे.

## 'सातारा गॅझेटियर' लवकरच लागू होणार



■ मुंबई : मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर काही महिन्यांपूर्वी मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मोठ्या प्रमाणात आंदोलन केले होते. याचा परिणाम म्हणून आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा शासन निर्णय घेण्यात आला. त्यानंतर मराठवाड्यातील अनेक मराठा बांधवांना ओबीसी प्रवगार्तून आरक्षणाचा लाभ मिळण्यास सुरुवात झाली. उपोषण सुरू असताना हैदराबादसह सातारा गॅझेट देखील लागू करण्याचे मान्य करण्यात आले होते. परंतु, अद्याप सातारा गॅझेट लागू झाले नसल्याने मराठा समाजात संभ्रम निर्माण झाला होता. याच संदर्भात मंत्रालयात पार पडलेल्या मराठा आरक्षण उपसमितीच्या बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात आजच्या बैठकीत सातारा गॅझेटियरवर प्रामुख्याने चर्चा झाली आहे. तसेच हैदराबाद गॅझेटियर अंमलबजावणी आणि मराठा आरक्षण विषयावर आढावा घेण्यात आला. त्यानुसार, राज्यातील जिल्हा परिषद निवडणुकीनंतर सातारा गॅझेटियर लागू करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमुळे सातारा गॅझेट लागू करण्यास अडचणी येत असल्याचे म्हटले जात आहे.

## बांगलादेशींवर कारवाईच्या नावाखाली पोलिसांकडून लूट

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :
घुसखोर बांगलादेशींवर कारवाई करण्याच्या गृहविभागाच्या आदेशाचा काही पोलिस अधिकाऱ्यांनी चक्क 'धंदा' मांडल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. खाकी वदीर्तील दरोडेखोरांचा नवी मुंबई आणि कल्याण परिसरात उच्छाद पाहायला मिळत असून, घुसखोर बांगलादेशींविरोधातील कारवाईचा फायदा घेत त्यांनाच लुटणाऱ्या एका सहायक पोलिस निरीक्षकासह चार पोलिस कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईच्या नावाखाली घरात घुसून रोख रक्कम आणि दागिने असा सुमारे २५ ते ३० लाखांचा ऐवज लुटल्याचा खळबळजनक प्रकार चेंबूरच्या आरसीएफ पोलिस तपासात उघडकीस आला आहे. नवी मुंबईतील एका बारमध्ये काम करणारी अस्मा पॉली (मूळची बांगलादेशी) ही २ जानेवारी २०२६ रोजी कोपरखैरणे येथील तिच्या घरी असताना, साध्या वेशात काही पोलिस एका एजंटसह तिच्या घरी आले.

## मासिक पाळी स्वच्छता व जागरुकतेसह अशय सोशल ग्रुपचा डिसेंबर गिव्हिंग २०२५ यशस्वीरीत्या संपन्न

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २७ :
महिलांच्या आरोग्य, स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने कार्यरत असलेल्या अशय सोशल ग्रुपचा डिसेंबर गिव्हिंग कॅम्पेन २०२५ हा उपक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

या उपक्रमांतर्गत तालुका चिमूर, जिल्हा चंद्रपूर येथील सातारा व ब्राम्हणगाव या दोन गावांमध्ये मासिक पाळीतील स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली तसेच मासिक पाळी च्या टप्प्यातील सर्व महिला व मुलींना पुनर्वापरयोग्य कापडी पॅड्सचे चार संच वितरित करण्यात आले. या कार्यक्रमात प्लास्टिक सॅनिटरी पॅड्समुळे होणारे आरोग्यविषयक संसर्ग, पर्यावरणातील वाढता कचरा व आर्थिक भार याबाबत माहिती देण्यात आली. तसेच आरोग्यदृष्ट्या सुरक्षित, पर्यावरणपूरक व दीर्घकाळ वापरता येणारे कापडी पॅड्स हा शाश्वत पर्याय असल्याचे उपस्थित महिलांना



समजावून सांगण्यात आले. विशेष म्हणजे हे कापडी पॅड्स योग्य प्रकारे धुवून वाळवून दोन ते तीन वर्षे सहज वापरता येतात अशी माहिती देखील देण्यात आली. यामुळे महिलांची आर्थिक बचत होण्यासोबतच स्वच्छता आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार आहे. गेल्या नऊ वर्षांपासून अशय सोशल ग्रुप ही संस्था महिलांचे आरोग्य जपणे, त्यांची प्रतिष्ठा उंचावणे आणि पर्यावरणाची काळजी घेणे या उद्देशाने डॉ. सीमा खंडाळे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत आहे.

## सहा फेब्रुवारीला नाशिकच्या महापौर-उपमहापौरांची निवड

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. २७ :
अवघ्या शहर-जिल्ह्याचेच नव्हे तर राज्याचे लक्ष वेधलेल्या नाशिक महापालिकेच्या महापौर-उपमहापौरांची निवड ६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. याशिवाय धुळे, अहिल्यानगर आणि जळगाव महारापालिकेच्या महापौर आणि उपमहापौरपदाचीही निवड दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. मालेगाव महापालिकेच्या महापौर-उपमहापौर निवडीसाठी ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता निवड होणात आहे. संबंधित महापालिकेच्या सभागृहात विशेष बैठक आयोजित करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिले आहेत. महापालिकेच्या महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडणुकीसाठी विशेष बैठकीचे पीठासीन अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त किंवा त्यांचा प्रतिनिधी असेल, अशी तरतूद आहे. त्या अनुषंगाने संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांनी पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. नवनिर्वाचित सदस्यांमधून नाशिक महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर यांच्या निवडीसाठी ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता नाशिक महापालिका सभागृहात विशेष बैठक आयोजित करण्यात आली. नवनिर्वाचित सदस्यांमधून धुळे महापालिकेच्या महापौर व उपमहापौर यांच्या निवडीसाठी धुळे महापालिका सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली असून, विभागीय आयुक्त यांच्या प्रतिनिधी म्हणून जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांची पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## वेळ वाया घालू नका, अर्ज मागे घ्या!



■ सांगली : सत्ताधारी भाजपने जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीतही आपले उमेदवार बिनविरोध निवडून आणण्यासाठी कंबर कसली आहे. या अंतर्गत मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विरोधकांच्या उमेदवारांना आपला वेळ व पैसा वाया न घालवता निवडणुकीतून माघार घेण्याचे वादग्रस्त आवाहन केले आहे. त्यांच्या या विधानामुळे वाद पेटण्याची शक्यता आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी अर्ज मागे घेण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगली जिल्ह्यातील एका कार्यक्रमात बोलताना उपरोक्त विधान केले आहे. नगरपालिका, नगरपरिषद व महापालिका निवडणुकीत भाजपला घवघवीत यश मिळाले. विरोधकांनी या निवडणुकांचे विश्लेषण करून आत्मपरीक्षण करावे. त्यांना या निवडणुकांच्या निकालावरून जमिनीवरील वस्तुस्थिती लक्षात आली असेल. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत विरोधकांचा टिकाव लागणार नाही. त्यामुळे त्यांनी आपला वेळ व पैसा वाया घालवू नये. त्यांनी सरळ आपले अर्ज मागे घ्यावेत. त्यातच त्यांचा शहाणपणा आहे, असे ते म्हणालेत.

## एसटीच्या प्रत्येक इंधन पंपावर आता भविष्याची चार्जिंग
# परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :
बदलत्या काळाची चाहूल ओळखत आणि पर्यावरणपूरक भविष्यासाठी ठोस पाऊल टाकत, राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी एसटीच्या जागेवर उभारल्या जाणाऱ्या किरकोळ इंधन विक्री केंद्रांवर ईव्ही (इलेक्ट्रिक वाहन) चार्जिंग स्थानकांना प्राधान्य देण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश दिले.

मंत्रालयातील आपल्या दालनात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, संबंधित वरिष्ठ अधिकारी तसेच विविध इंधन कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मंत्री सरनाईक म्हणाले की, भारत 2047 पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना, वाहतूक व्यवस्थेतही हरित क्रांती घडवून आणणे अत्यावश्यक आहे. भविष्यातील प्रवास हा इलेक्ट्रिक ऊर्जेवर आधारित असेल, आणि एसटी महामंडळ त्यासाठी आजपासूनच पायाभूत सुविधा उभारण्यास कटिबद्ध आहे.

सध्या एसटीच्या सुमारे ९० टक्के बसगाड्या पारंपरिक डिझेल इंधनावर धावत असल्या, तरी टप्प्याटप्प्याने त्यांचे इलेक्ट्रिक बसमध्ये रूपांतर करण्याचे नियोजन सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय भविष्यातील नव्या



बस खरेदीमध्येही ई-बसेसना प्राधान्य दिले जाणार आहे. याच दृष्टीने, एसटीच्या जागेवर सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून उभारल्या जाणाऱ्या इंधन पंपांवर डिझेल आणि सीएनजीसह ईव्ही चार्जिंग स्टेशनची उभारणी बंधनकारक करण्याचा विचार असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रकल्पात एसटीला आर्थिक उत्पन्नाचा स्रोत निर्माण करण्याबरोबरच एकाच ठिकाणी पारंपरिक इंधन आणि इलेक्ट्रिक चार्जिंगची सुविधा उपलब्ध झाल्यास, भविष्यातील वाहनव्यवस्थेला मोठी चालना मिळेल. ही केवळ सुविधा नाही, तर पर्यावरण संरक्षणासाठी उचललेले दूरदृष्टीचे पाऊल आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले. या निर्णयामुळे एसटी महामंडळ केवळ प्रवासी वाहतुकीतच नव्हे, तर हरित ऊर्जेच्या प्रसारातही अग्रणी भूमिका बजावणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

## स्पीकर कोसळून चिमुकलीचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २७ :
राज्यात प्रजासत्ताक दिनाचा उत्साह सुरू असतानाच मुंबई आणि भिवंडी येथे घडलेल्या दोन वेगवेगळ्या, पण तितक्याच धक्कादायक घटनांनी सर्वांनाच हादरवून टाकले आहे. मुंबईतील विक्रोळी टागोर नगर परिसरात निष्काळजीपणामुळे एका चिमुकलीला आपला जीव गमवावा लागला, तर भिवंडीत घरगुती वाद मिटवण्यासाठी गेलेल्या तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली. या दोन्ही घटनांमुळे कायदा-सुव्यवस्था, निष्काळजीपणा आणि वाढत्या हिंसाचारावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. एकीकडे उत्सवाच्या तयारीतून झालेली दुर्घटना, तर दुसरीकडे कौटुंबिक वादातून झालेला खून, अशा दोन घटनांनी समाजमन सुन्न झाले आहे.

मुंबईतील विक्रोळी टागोर नगरमधील आंबेडकर नगर परिसरात 26 जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त कार्यक्रमासाठी लावण्यात आलेला मोठा स्पीकर अचानक कोसळून एका तीन वर्षांच्या मुलीवर पडला. या घटनेचा थरारक सीसीटीव्ही व्हिडीओ समोर आला असून, त्यात स्पीकर पडताच चिमुकली खाली अडकताना दिसत आहे. या घटनेत ती गंभीर जखमी झाली होती. तातडीने तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले, प्राथमिक माहितीनुसार, चिंध्या गोळा करणाऱ्या एका व्यक्तीच्या निष्काळजीपणामुळे हा स्पीकर हलल्याचा आणि अपघात घडल्याचा आरोप आहे.

# लाल झेंड्यांच्या साक्षीने लॉन्ग मार्च

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २७ :
नाशिकपासून सुरू झालेल्या आदिवासी आणि शेतकऱ्यांच्या लॉन्ग मार्चने राज्यातील प्रलंबित प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणले आहेत. वन हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, अनुसूचित क्षेत्रांमध्ये पंचायतींना अधिक अधिकार देणाऱ्या कायद्याची अंमलबजावणी, रखडलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करणे आणि जिल्हा परिषद शाळांमधील रिक्त पदे तातडीने भरणे या प्रमुख मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला आहे. हजारो आदिवासी आणि शेतकरी मुंबईच्या दिशेने पायी निघाले असून, रस्त्यात मिळेल तिथे मुक्काम करत पुन्हा मार्गक्रमण करत आहेत.

या आंदोलनाचे नेतृत्व कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाशी संलग्न अखिल भारतीय किसान सभा करत आहे. लाल झेंडे हातात घेऊन शिस्तबद्ध पद्धतीने सुरू असलेल्या या लॉन्ग मार्चमुळे ग्रामीण भागातील प्रश्नांना पुन्हा एकदा व्यापक लक्ष मिळाले आहे. मोर्चेकऱ्यांचे म्हणणे आहे



की त्यांच्या मागण्या याआधीही सरकारकडे मांडण्यात आल्या, आश्वासनेही मिळाली, मात्र प्रत्यक्षात अंमलबजावणी न झाल्याने प्रशासनावरील विश्वास कमी झाला आहे.

या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तहसील कार्यालयाबाहेर आधी आंदोलन करण्यात आले होते. मात्र त्या आंदोलनातून कोणतेही ठोस आश्वासन न मिळाल्याने थेट राज्य सरकारपर्यंत पोहोचण्याचा निर्णय शेतकरी आणि आदिवासी संघटनांनी घेतला. त्यानुसार रविवारी नाशिकहून मुंबईच्या दिशेने पायी कूच करण्यात आले. आंदोलनादरम्यान अन्नधान्य, पाणी, सरपण आणि इतर आवश्यक साहित्याची स्वतः व्यवस्था करण्यात आली आहे, असे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या दोन दिवसांत मोर्चेकऱ्यांनी सुमारे 60 किलोमीटरचे अंतर पार केले असून, मंगळवारी सकाळी कसारा घाट उतरून ते ठाणे जिल्ह्यात दाखल झाले आहेत. मोठ्या संख्येने शेतकरी आणि आदिवासी या मोर्चात सहभागी झाले असून, संपूर्ण मार्गावर शांततापूर्ण पण ठाम भूमिका घेत सरकारपर्यंत आपला आवाज पोहोचवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

या सततच्या सामूहिक प्रयत्नांमुळे आणि माध्यमांमध्ये मोचार्ला मिळालेल्या प्रसिद्धीमुळे अखेर राज्य सरकारने आंदोलनकर्त्यांच्या प्रतिनिधिमंडळाला चचेर्साठी निमंत्रित केले आहे. मंगळवारी मुंबईतील मंत्रालयात मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांसोबत चर्चा होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या प्रतिनिधिमंडळात माजी आमदार जे. पी. गावित, माकपाचे पोलित ब्युरो सदस्य व अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक धवले, किसान सभेचे राष्ट्रीय संयुक्त सचिव अजित नवले आणि आमदार विनोद निकोले यांचा समावेश आहे. याआधी नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्यासोबतही बैठक झाली होती. त्या बैठकीत स्थानिक पातळीवरील प्रश्न जिल्हा स्तरावर सोडवले जातील, तर राज्यस्तरीय मागण्या मुंबईत मांडण्यात येतील, अशी सहमती झाल्याचे गावित यांनी सांगितले. मात्र, अनेक वेळा आश्वासनांपुरतेच प्रश्न थांबल्याचा अनुभव असल्याने, यावेळी ठोस निर्णय होणे अत्यावश्यक असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

# संवेदनशील मनाचे बहुआयामी व्यक्तिमत्व डॉ. अनिल अवचट



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

मुक्तांगणचे संस्थापक जेष्ठ समाजसेवक, पत्रकार, चित्रकार, प्रसिद्ध लेखक, बाल साहित्यकार डॉ. अनिल अवचट ( बाबा ) यांची काल म्हणजे २७ जानेवारी रोजी चौथी पुण्यतिथी होती. चार वर्षापुर्वी म्हणजे २७ जानेवारी २०२२ रोजी अनिल अवचट यांचे वयाच्या ७८ व्य वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले होते. त्यांच्या निधनाने एक बहुआयामी, संवेदनशील व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ. अनिल अवचट यांचा जन्म २६ ऑगस्ट १९४४ रोजी पुणे जिल्ह्यातील ओतूर या गावात झाला. लहानपणापासून अभ्यासात हुशार असणारा अनिल अवचट यांनी पुणे शहरातील बी.जे मेडिकल कॉलेजमधून एम बी बी एस चे शिक्षण पूर्ण केले. कॉलेज जीवनात असताना त्यांनी अनेक चळवळीत भाग घेतला. युवक क्रांती दलाचे ते सक्रिय कार्यकर्ते होते. डॉ अनिल अवचट हे पेशाने पत्रकार आणि लेखक होते. आपली लेखणी त्यांनी कायमच सामान्य जनतेच्या हितासाठी वापरली. डॉ. अनिल अवचट हे स्वतः पत्रकार होते तरी त्यांनी पत्रकारितेतील व्यावसायिकतेला नेहमीच नकार दिला. त्यांनी आपली पत्रकारिता नेहमीच गरिबी, भ्रष्टाचार, अन्यायाचे बळी असलेल्या जनतेच्या हितासाठी वापरली. डॉ. अनिल अवचट यांनी गरीब, मजूर, दलीत, वंचित, भटक्या, विमुक्त जाती जमाती, वेश्या यांच्या प्रश्नांविषयी विपुल लेखन केले. विविध प्रश्नांवर लढा देताना आपले आयुष्य एखाद्या प्रश्नांसाठी खर्च करणाऱ्या कार्यकर्त्यांविषयीही त्यांनी लेखन केले. १९६९ साली त्यांचे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. त्या पुस्तकाचे नाव पूर्णिया असे होते. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. त्यांची एकूण २२ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांचे लेखन प्रेरणादायी होते. तरुण लेखकांचे ते प्रेरणास्रोत होते. तरुण लेखकांना मार्गदर्शन करण्यात ते नेहमीच पुढे असत. डॉ. अनिल अवचटांच्या लिखणाप्रमाणेच त्यांचे सामाजिक कार्यही प्रेरणादायी आहे. डॉ. अनिल अवचट हे पुण्यातील मुक्तांगण वयसनमुक्ती केंद्राचे संचालक होते. त्यांनी आपल्या पत्नी डॉ सुनंदा अवचट यांच्या सहकायार्ने व्यसनमुक्तीची शोधलेली अनोखी पद्धत ही जगभरातील अनेक व्यसनमुक्ती केंद्रात वापरली जाते. मुक्तांगणच्या माध्यमातून त्यांनी हजारो तरुणांना व्यसनमुक्त केले आहे. व्यसनमुक्ती क्षेत्रात त्यांचे कार्य अतुलनीय असे आहे. डॉ. अनिल अवचट हे केवळ लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते नव्हते तर एक उत्तम कलाकारही होते. त्यांची चित्रे, लाकडातील शिल्पे, ओरिगामी, छायाचित्रे, बासरी वादन यातून त्यांच्या अंगभूत कलांची ओळख होते. सामाजिक कायार्साठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. डॉ. अनिल अवचट यांची पुस्तके सलग तीन वर्ष महाराष्ट्र शासनाने सर्वोत्कृष्ट पुस्तके म्हणून जाहिर केली आहेत. अमेरिकेतील ओहीओ प्रांतात झालेल्या आंतरराष्ट्रीय लेखकांच्या संमेलनात त्यांच्या साहित्याचा गौरव करण्यात आला होता. सातारा येथील न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे प्रतिष्ठान तर्फे दिला जाणारा सामाजिक न्याय पुरस्कार ( २००७ ), साहित्य अकादमीतर्फे प्रथम बाल साहित्य पुरस्कार (२०१० ), महाराष्ट्र राज्य पुरस्कार ( २०११ ) तसेच त्यांच्या मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राला पुल कृतज्ञता पुरस्कार (२०१५ ) अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरिवण्यात आले आहे. त्यांच्या निधनाने संवेदनशील मनाचे बहुआयामी व्यक्तिमत्व हरपले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. डॉ. अनिल अवचट यांना चौथ्या पुण्यतिथीनमित्त विनम्र अभिवादन!

## ‘जिल्हास्तरीय बालमहोत्सवा’चा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते शुभारंभ

अकोला : ‘जिल्हास्तरीय चाचा नेहरू बालमहोत्सवा’च्या शुभारंभ जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते आज वसंत देसाई क्रीडांगण येथे झाला.विविध स्पर्धा व उपक्रमातील सहभागाने कलागुणांना झळाळी मिळते आणि व्यक्तिमत्व विकासात त्याने मोलाची मदत होते. मुलांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्यात सांघिक भावना निर्माण होण्यासाठी महोत्सव उपयुक्त ठरेल, असा विश्वास जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी यावेळी व्यक्त केला.बाल हक्क संरक्षण आयोगाचे माजी सदस्य ॲड. संजय सेंगर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर, ठाणेदार मनोज केदारे,



शिरीष खंडारे, बालकल्याण समिती सदस्य ॲड. अनिता गुरव, सारिका घिरणीकर, ॲड, शीला तोष्णीवाल, राजेश देशमुख, प्रांजली जैस्वाल, राजू लाडुलकर, संजय मोटे आदी उपस्थित होते. बालमहोत्सवातून व्यक्तिमत्व विकासात मोलाची मदत होत असते. हा महोत्सव एक उत्तम संधी समजून यात सहभागी विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी करावी अशा सदिच्छा जिल्हाधिका-यांनी यावेळी व्यक्त केल्या. गायत्री, सूर्योदय, शासकीय बालगृहाबरोबरच ४ शाळांच्या ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी महोत्सवात सहभागी झाले आहेत. हा महोत्सव दि. २९ जानेवारीपर्यंत चालणार असून, क्रीडा, सांस्कृतिक स्पर्धांबरोबरच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात विविध ठिकाणी भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा

## अद्ययावत तंत्रज्ञानाद्वारे योजना व सेवा अधिकाधिक लोकाभिमुख करण्यावर भर:पालकमंत्री

अकोला : केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करतानाच, अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून सेवा अधिकाधिक लोकाभिमुख करण्यावर भर देण्यात येत आहे, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे केले.

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय समारंभात पालकमंत्र्यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन, राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत, पथसंचलन, कवायती, सांस्कृतिक कार्यक्रम आदी कार्यक्रम लालबहादुर शास्त्री क्रीडांगण येथे झाले, त्यावेळी ते बोलत होते. आमदार अमोल मिटकरी, आमदार वसंत खंडेलवाल, जिल्हाधिकारी वर्षा मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, मनपा आयुक्त सुनील लहाने आदी उपस्थित होते.पालकमंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या खंबीर नेतृत्वात भारत देश प्रगतीच्या प्रत्येक क्षेत्रात झेप घेत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गतिमान विकासाची कास धरून महाराष्ट्राचे पहिल्या क्रमांकावरचे स्थान अधिक दृढ केले आहे. नागरिकांच्या आशा-आकांक्षाचे प्रतिबिंब शासकीय निर्णयात व कारभारात असावे, असा शासनाचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. नागरिकांच्या गरजा जाणून घेऊन त्यानुसार प्रतिसाद प्रणाली निर्माण करण्यासाठी अद्ययावत



तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे.

जिल्हा डॅशबोर्ड, जिल्हा वॉररूम, व्हॉटस्ॲप



चॅटबोट आदी नूतन सेवांचाही उल्लेख त्यांनी केला.ते पुढे म्हणाले की, शेतकरी, कामगार, महिला अशा विविध घटकांसाठी अनेक योजना शासन राबवित आहे. अतिवृष्टी व पुरामुळे नुकसानाच्या अनुषंगाने ३ लक्ष ३१ हजार ९९४ शेतकऱ्यांच्या खात्यात २६० कोटी ३९ लक्ष २६ हजार रू. मदत निधी डीबीटीद्वारे जमा करण्यात आला. जिल्ह्यात खरीप हंगामात १ हजार ७० कोटी रू. तसेच रब्बी हंगामात ७९ कोटी रू. कर्ज वितरण झाले. प्रधानमंत्री पीक विमा योजनेत खरीप हंगामामध्ये २ लक्ष २२ हजार ८४ शेतकरी सहभागी असून १ लक्ष ८४ हजार १९१ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले आहे. रब्बी हंगामात ४७ हजार ७७० शेतकरी सहभागी होऊन ४७ हजार ५१२ हे. क्षेत्र विमा संरक्षित झाले.कृषी यांत्रिकीकरण, मनरेगा, तसेच भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, पीएम सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना, राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान योजनांच्या अंमलबजावणीचीही त्यांनी माहिती दिली. ते पुढे म्हणाले की, आरोग्य विभागातर्फे विस्तारित आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम,



सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना, राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासक कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. शिवापूर, पातूर, बोरगाव मंजूर, अकोट येथील रुग्णालयाच्या इमारतींची कामे लवकरच पूर्ण होतील. अकोला जिल्हा पोलीस दलाकडून ‘प्रोजेक्ट त्रिनेत्र’ हा ‘एआय’ आधारित प्रकल्प राबविण्यात येत असून, ‘बॉडी क्राईम’ प्रकारातील गुन्ह्यात ६४ टक्के घट झाली आहे. ‘प्रोजेक्ट रक्षा’ या नागरिक प्रतिसाद प्रणालीद्वारे पोलीस सेवेची गुणवत्ता तपासून आवश्यक सुधारणा करण्यात येतात.

## महापालिकेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा
### आयुक्त डॉ.सुनील लहाने यांच्या हस्ते ध्वजारोहण

अकोला : दि. २६ जानेवारी २०२६ रोजी भारतीय प्रजासत्ताकाच्या दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त अकोला महानगरपालिकेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात महानगरपालिका मुख्य कार्यालय येथे मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाला. यावेळी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.लहाने यांनी उपस्थित सर्व नवनिर्वाचित सदस्य, मनपा अधिकारी/कर्मचारी तसेच शहरातील सर्व नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच अकोला महानगरपालिका क्षेत्रात मनपाच्या पाणी पुरवठा विभाग, बांधकाम विभाग, प्रधानमंत्री आवास योजना विभाग, स्वच्छता विभाग, वैद्यकीय आरोग्य विभाग, छणङ्च आदि विभागांव्दारे शहरात होणारे विकासात्मक कामे, सेवा व आगामी काळात होणा-या नाविन्यपुर्ण कामाबाबत माहिती दिली.

तसेच अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा स्वच्छ अभियान २.० व माझी वसुंधरा ६.० अंतर्गत पर्यावरणपूरक घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सव २०२५ स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते त्या अनुषंगाने दि. २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनाचे वर्धापन दिनाचे ऑचित्य साधून मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या हस्ते पर्यावरणपूरक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांपैकी प्रथम क्रमांक आलेले काळा मारोती मित्र मंडळ, जुने शहर, अकोला यांना ५१ हजार रोख रक्कम आणि प्रमाणपत्र, व्दितीय क्रमांक आलेले मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळ, अकोला यांना ३१ हजार रोख रक्कम आणि प्रमाणपत्र आणि तृतीय क्रमांक आलेले विघ्नहर्ता गणेशोत्सव मंडळ (गोरक्षण रोडचा राजा), गोरक्षण रोड, अकोला यांना ११ हजार रोख रक्कम आणि प्रमाणपत्र सन्मानित करण्यात आले, तसेच पर्यावरणपूरक घरगुती गणेशोत्सव स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेले प्रमोद लक्ष्मणराव डेहाणकर, लक्ष्मी नगर, अकोला यांना ११ हजार रोख रक्कम आणि प्रमाणपत्र, व्दितीय क्रमांक आलेले ज्ञानेश्वर रामभाऊ मांडेकर, शिवाजी नगर,अकोला यांना ७ हजार रोख रक्कम आणि प्रमाणपत्र आणि तृतीय क्रमांक आलेले स्नेहा पवन केडिया, गिता नगर, शिवमंदीर, अकोला यांना ५ हजार रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.अकोला महानगरपालिका आपल्या शहरामधील नागरिकांचे जीवनमान उंचावण्याकरीता, दर्जेदार विकास



कामे करण्यास व नागरिकांना मुळभूत सेवा देण्यास कटिबध्द असून शहरातील नागरिकांनीही आपली कर्तव्ये चोखपणे पार पाडणे अत्यंत गरजेचे आहे. शहरातील नागरिकांना थकित मालमत्ता कराचा भरणा करणे अधिक सोईचे व्हावे याकरीता प्रशासनाव्दारे ४ टप्प्यांमध्ये शास्ती अभय योजना सुरू करण्यात आली आहे. याचा लाभ घेऊन शहरातील सर्व थकित मालमत्ता धारकांनी थकित करचा भरणा करून या संधीचा लाभ घ्यावा.

## विदर्भात रुजलेली सर्वार्थाने आदर्श ‘मॉडेल व्हिलेज’ संकल्पना देशव्यापी व्हावी : कुलगुरू डॉ. शरद गडाख

**अकोला** : सर्वार्थाने परिपूर्ण ग्रामीण भारत कृतीत साकारणेसाठी शाश्वत शेती आणि संपन्न शेतकरी ब्रीद अधिक वृद्धिंगत करीत डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाद्वारा विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यात कार्यान्वित केलेली ‘मॉडेल व्हिलेज‘ संकल्पना आता दुसऱ्या टप्प्यात विदर्भातील प्रत्येक तालुक्यात विस्तारित करीत अधिक लोकाभिमुख करण्याचा संकल्प डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी व्यक्त केला. भारतीय प्रजासत्ताकाच्या ७७ व्या वर्धापनदिनी विद्यापीठ मुख्यालयात आयोजित प्रजासत्ताक दिन कार्यक्रम प्रसंगी उपस्थित प्राध्यापक,अधिकारी, कर्मचारी,विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. देश सर्वार्थाने विकसित होण्यासाठी गाव खेड्यांचा शाश्वत विकास ही प्राथमिकता असून कृषी-अकृषी विद्यापीठांसह सर्व शासकीय,



निमशासकीय विभाग सहकारी, सेवाभावी, खाजगी संस्थांनी एकत्र येत गावांच्या गरजा लक्षात घेऊन सामुहिक पद्धतीने नियोजन केल्यास सर्वसंपन्न खेडे निर्माण होतील व पर्यायाने विदर्भातील ‘मॉडेल व्हिलेज‘चा हा पॅटर्न देशपातळीवर स्वीकारल्या जाईल असा देखील आत्मविश्वास आपले संबोधनात व्यक्त केला. विद्यापीठाच्या गत वर्षभरातील उपलब्धींना अधोरेखित करताना कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावरील कामगारांपासून संचालकांपर्यंत सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त करीत आत्मनिर्भर विद्यापीठ निर्मितीसाठी आजवरची वाटचाल समाधानकारक असल्याचे प्रसंशापूर्ण उद्गार देखील काढले. कार्यक्रम स्थळी राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट सह विद्यापीठ सुरक्षा विभाग आदींनी कुलगुरूंना मानवंदना दिली व शिस्तबद्ध मार्चपाच नंतर कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी राष्ट्रध्वज फडकविला व राष्ट्रगीत तथा राज्य गीता नंतर सर्वांना संबोधित केले.

## जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा जयहिंद चौक येथे प्रजासत्ताकदिनाचा सोहळा थाटात संपन्न

**अकोला :** जुने शहरातील जयहिंद चौक येथील अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा येथे प्रजासत्ताकदिनाचा सोहळा थाटात संपन्न झाला. याप्रसंगी बँकेच्या शाखा अधिकारी वनिता काळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार विजय केंदरकर तसेच ज्येष्ठ नागरिक रमेश नाळे प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत गायिले. तदनंतर भारत माता की जय, वंदे मातरम चा जयघोष देण्यात आला. यानंतर जय जय महाराष्ट्र माझा, हे गीत सादर करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी तिरंग्याला सलामी दिली. तसेच बँक अधिकारी, कर्मचारी यांनीही वंदन केले.



## शुन्य थकबाकी आणि वितरण हानी कमी करण्यासाठी सांघिक प्रयत्न करावे : मुख्य अभियंता

अकोला : विद्युत भवन येथे भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीत झाले.

यावेळी बोलतांना मुख्य अभियंता म्हणाले की, इज ऑफ लिव्हींगनुसार महावितरणच्या विविध सेवा ग्राहकाभिमूख करतांना महावितरणच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजना, मागेल त्याला सौरकृषी पंप योजना, स्मार्ट योजना, मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना आदी योजनांची




अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करावी. वितरण हानी कमी करून वीजबिलाची थकबाकी शुन्य करणे हे अकोला परिमंडळाच्या अस्तित्वासाठी आवश्यक असून यासाठी सामुहिक प्रयत्न जोड महत्वाची असल्याचे ते म्हणाले.प्रत्येक कर्मचाऱ्यांनी आपल्याला सोपवून दिलेली जबाबदारी ,दिलेले लक्ष्य स्वताच प्रेरीत होवून प्रत्येक महिन्याला पुर्ण करणे ही काळाची गरज असल्याचेही ते म्हणाले.

कार्यक्रमाला अधीक्षक अभियंती दिपक सोनोने, कार्यकारी अभियंते अजितपालसिंह दिनोरे, धीरज चव्हाण, शंशांक पोंक्षे, प्रणाली विश्लेषक शडानंद सरोदे. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अरूण शेलकर यांच्यासोबत अधिकारी, अभियंते व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तेल्हारा आगारात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**तेल्हारा :** रा. प. तेल्हारा आगारात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आगार व्यवस्थापक श्री. मिथुन रा. शर्मा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीत व राज्यगीताचे गायन करण्यात आले.यानंतर आगारातील १५ व ३० वर्षे अपघातविरहित सुरक्षित सेवा बजावलेल्या २० चालक कर्मचाऱ्यांना सुरक्षित सेवेचा बिल्ला व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. उपस्थित कर्मचाऱ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. आगार सलग दोन महिने नफ्यात असल्याबद्दल सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.



भविष्यातही उत्कृष्ट सेवा देत रा. प. महामंडळ नफ्यात ठेवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन आगार व्यवस्थापकांनी केले.कार्यक्रमास आगारातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रजासत्ताक दिना निमित्त पत्रकार भवनमध्ये झेंडा वंदन

अकोला : अकोला जिल्हा पत्रकार संघा तर्फे प्रजासत्ताक दिना निमित्त पत्रकार भवन मध्ये ज्येष्ठ पत्रकार संजय खांडेकर यांच्या हस्ते झेंडा वंदन करण्यात आले या प्रसंगी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष शौकत अली मिरसाहेब, मराठी पत्रकार परिषदेचे माजी अध्यक्ष सिद्धार्थ शर्मा, माजी आमदार लक्ष्मणरावं तायडे, डॉ मोहन खडसे,दीपक देशपांडे,कमल किशोर शर्मा,समाधान खरात,एड शरद गांधी, राजू उखळर्क , ज्येष्ठ पत्रकार विनायक काजळे गुरुजी, तुषार हांडे, दिलीप गिऱ्हे, फुलचंद मौर्य, राहुल खाडे, अभिषेक पांडे, मो एजाज खान, सर्वेशचंद्र कटियार,मनीष खर्चे, डॉ कांचन गावंडे,अजय चव्हाण, मुकुंदरावं देशमुख, विजय ढवळे, आदी सह पत्रकार गण उपस्थित होते, सिद्धार्थ शर्मा व मिरसाहेब यांनी प्रजासत्ताक दिना निमित्त सर्व पत्रकारांना शुभेच्छा दिल्या.



## जिल्हा परिषदेत प्रजासत्ताक दिन सोहळा उत्साहात २७ कर्मचाऱ्यांचा उल्लेखनीय कामासाठी सन्मान

अकोला : भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन सोहळा आज मोठ्या दिमाखात जिल्हा परिषदेच्या परिसरात जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या हस्ते ध्वजारोहणाने पार पडला. यावेळी जिल्हा परिषदेच्या विविध विभागात उल्लेखनीय काम करणाऱ्या २७ कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषदेचे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे, मुख्य लेखा वित्त अधिकारी माया शिर्के, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग अतुल सोळंके, शिक्षणाधिकारी माध्यमिक श्री माहुरे, शिक्षणाधिकारी प्राथमिक रतनसिंग पवार, सहाय्यक गटविकास अधिकारी हरिनारायण परिहार,यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित



होते. यावेळी स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल तापडिया नगर च्या स्काऊट गाईड पथकाने ध्वज संचालन करीत सलामी दिली. महाराष्ट्र माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व राज्य गीत गायन केले. संविधान दिनानिमित्त संविधान दिनानिमित्त समाज कल्याण विभागामार्फत आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत अकोला जिल्ह्यातून प्रथम आलेल्या सुंदर भीमराव इंदोरे या विद्यार्थ्यास रोख बक्षीस रक्कम व प्रशस्त पत्र देऊन सन्मानित करण्यात आले व दिव्यांग क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या पंकज जगतराव जायले यांना विभागामार्फत देण्यात येणाऱ्या प्रेरणा पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

सर्व कर्मचाऱ्यांना तंबाखू मुक्त भारताची शपथ देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# जुनी पेन्शन : कृपा नव्हे, हक्क!

जुनी पेन्शन योजना ही शासनाची कृपा नसून, आयुष्यभर प्रामाणिकपणे सेवा दिलेल्या शिक्षकांचा कायदेशीर, नैतिक आणि घटनात्मक हक्क आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या हक्कावर अन्याय, दिरंगाई आणि धोरणात्मक उदासीनतेची छाया पडलेली होती. मात्र, १३ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयाने या अन्यायाला ठाम शब्दांत आव्हान दिले आहे. हा निकाल केवळ न्यायालयीन आदेश नसून, शिक्षकांच्या स्वाभिमानाचा, सुरक्षिततेचा आणि हक्कांच्या संघर्षाचा ऐतिहासिक विजय आहे. या संपूर्ण लढ्याच्या केंद्रस्थानी उभी असलेली NUTA (Nagpur University Teachers' Association) ही संघटित संघर्ष, कायदेशीर लढा आणि निर्भीड नेतृत्वाचे प्रभावी प्रतीक ठरली आहे. त्या अनुषंगाने प्रस्तुत लेखात या निर्णयाचा आणि संघर्षाचा सखोल आढावा घेण्यात येत आहे.

--------------

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिरात व निवड प्रक्रिया पूर्ण झालेल्या, मात्र नियुक्ती १ नोव्हेंबर २००५ नंतर झालेल्या २८ प्राध्यापकांना जुनी पेन्शन योजना नाकारणे हा सरळसरळ अन्याय आहे, असे माननीय मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने स्पष्टपणे नमूद केले आहे.

शासनाने आजवर केवळ एकच युक्तिवाद पुढे रेटला होता– ह्णनियुक्तीची तारीख १ नोव्हेंबर २००५ नंतर असल्यामुळे NPS लागू होते.ह्व मात्र हा युक्तिवाद किती कोता, एकांगी आणि कर्मचाऱ्यांच्या आयुष्यभराच्या आर्थिक सुरक्षिततेशी खेळ करणारा आहे, हे न्यायालयाने ठोसपणे अधोरेखित केले आहे.

न्यायालयाने स्पष्ट निरीक्षण नोंदवले की, जाहिरात, निवड व पात्रता प्रक्रिया ज्या कालावधीत पूर्ण झाली, तोच निर्णायक घटक ठरतो. केवळ नियुक्तीची तारीख आधार मानणे हे शासनाच्या धोरणात्मक अपयशाचे द्योतक आहे. त्यामुळे हा निकाल शासनाच्या मनमानी धोरणांवर दिलेली कठोर आणि निर्णायक चपराक ठरतो.

हा निर्णय केवळ २८ प्राध्यापकांपुरता मर्यादित आहे, असे मानणे ही मोठी चूक ठरेल. महाराष्ट्रातील विविध विद्यापीठे, अनुदानित व खाजगी शिक्षण संस्थांमध्ये हजारो शिक्षक असे आहेत, ज्यांची जाहिरात १ नोव्हेंबर २००५ पूर्वी झाली; मात्र शासनाच्या दिरंगाईमुळे नियुक्ती प्रक्रिया उशिरा पूर्ण झाली. प्रश्न साधा आहे.शासनाच्या विलंबाची शिक्षा शिक्षकांनी का भोगावी? आजचा निकाल यावर ठाम उत्तर देतो,अन्याय आता सहन केला जाणार नाही.

आजच्या काळात अनेक संघटना केवळ घोषणा, निवेदने आणि औपचारिक फोटोसेशनपुरतीच आपली भूमिका मर्यादित ठेवताना दिसतात. मात्र अशा पोकळ सक्रियतेच्या पलीकडे जाऊन NUTA ने आंदोलनासोबतच न्यायालयीन पातळीवर सखोल, शिस्तबद्ध आणि कागदोपत्री लढ्याची काटेकोर तयारी केली. जुनी पेन्शन योजनेसंदर्भातील हा संघर्ष भावनिक घोषणांवर नव्हे, तर कायद्याच्या भक्कम आधारावर उभा करण्यात आला.

न्यायालयात NUTA तर्फे शासन निर्णयांची संपूर्ण शृंखला, भरती प्रक्रियेतील जाहिराती, निवड समित्यांचे अधिकृत अहवाल, सेवाशर्तींचे नियम तसेच समान प्रकरणांतील न्यायालयीन पूर्वनिर्णय सादर करण्यात आले. या सुस्पष्ट आणि तथ्याधारित मांडणीमुळे हा संघर्ष कायदेशीर कसोटीवर टिकून राहिला आणि म्हणूनच तो यशस्वी ठरला. ही लढाई भावना नव्हे, तर संविधान,



**प्रा. डॉ. प्रशांत विघे**
**राज्यशास्त्र विषयाचे लेखक**
**भारतीय महाविद्यालय, अमरावती.**
**९३२६८७७७४९**

नियम आणि न्यायालयीन तत्त्वांवर लढली गेली, हेच तिच्या विजयाचे खरे कारण आहे.

हा विजय सहजपणे मिळालेला नाही. त्यामागे धैर्य, सातत्य आणि दबावाला न झुकणारे नेतृत्व आहे. ठवळअ चे अध्यक्ष डॉ. प्रवीण रघुवंशी आणि आदरणीय बी. टी. देशमुख यांनी कोणत्याही राजकीय दबावाला, प्रशासकीय दुर्लक्षाला किंवा वेळेच्या मर्यादांना न जुमानता हा संघर्ष शेवटपर्यंत नेला. डॉ. प्रवीण रघुवंशी यांची भूमिका सुरुवातीपासूनच स्पष्ट राहिली आहे,ह्णजुनी पेन्शन योजना (OPS,)हा शिक्षकांचा हक्क आहे. तो मिळेपर्यंत संघर्ष थांबणार नाही.ह्वअसे विचार व्यक्त केले.

आज शासकीय कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना संदर्भात शासन निर्णय अस्तित्वात असताना, खाजगी अनुदानित शिक्षण संस्थांतील शिक्षकांसाठी स्वतंत्र शासन निर्णय अद्याप का नाही? हा प्रश्न अधिक तीव्रतेने समोर येतो.

हे शिक्षक कमी काम करतात का? कमी पात्र आहेत का? किंवा कमी जबाबदारी घेतात का? या सर्व प्रश्नांची उत्तरे स्पष्टपणे नाही अशीच आहेत. मग हा भेदभाव कशासाठी? हा दुजाभाव नसून दुसरे काय, असा प्रश्न आजच्या न्यायालयीन निकालामुळे अधिक ठळकपणे अधोरेखित झाला आहे.

आजचा न्यायालयीन निकाल केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित न राहता, शासनासाठी एक स्पष्ट आणि ठाम इशारा ठरतो. शासनाने जाणीवपूर्वक निर्माण केलेली धोरणात्मक पोकळी, दिरंगाई आणि दुजाभाव जर कायम ठेवला, तर ती पोकळी न्यायालय भरून काढेल, असा स्पष्ट संदेश या निर्णयातून देण्यात आला आहे. शिक्षकांच्या हक्कांकडे दुर्लक्ष करून निर्णय टाळण्याची भूमिका आता चालणार नाही, हेच या निकालाचे खरे सार आहे.

या संपूर्ण संघर्षाबाबत सिनेट सदस्य व जुनी पेन्शन हक्कासाठी सातत्याने लढणारे प्रा.डॉ. प्रशांत विघे यांची भूमिका अधिकच वास्तववादी आहे. त्यांच्या मते, सेवकांचे हक्क ही कोणाच्याही कृपेची बाब नाही; ते कायदेशीर, घटनात्मक आणि नैतिक स्वरूपाचे असतात. हे हक्क मिळवण्यासाठी संघटित, सातत्यपूर्ण आणि कायदेशीर संघर्ष अपरिहार्य आहे. आजचा निकाल हेच स्पष्टपणे सिद्ध करतो.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या कायदेशीर हक्काची जुनी पेन्शन योजना प्राप्त करून देण्यासाठी जुनी पेन्शन संघटनेच्या नेतृत्वाखाली गेल्या दहाझबारा वर्षांपासून महाराष्ट्र शासनाविरोधात एक व्यापक, संघटित आणि सातत्यपूर्ण संघर्ष सुरू आहे.

या आंदोलनात वितेश खांडेकर, गोविंद उगले, आशुतोष चौधरी, गौरव काळे, नदीम पटेल, निलेश कानडे आणि शैलेश राऊत यांसारख्या लढाऊ व कटिबद्ध शैक्षणिक कार्यकर्त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

या संघर्षाची व्याप्ती केवळ एका विभागापुरती मर्यादित न राहता, राज्यातील विविध विभागांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि त्यांच्या संघटनांना एकत्र आणून राज्यव्यापी समन्वित लढा उभारण्यात आला आहे. या आंदोलनाचा मुख्य उद्देश एकच आहे.जुनी पेन्शन योजना ही शासनाची कृपा नसून कर्मचाऱ्यांचा कायदेशीर व घटनात्मक हक्क आहे, हे शासन आणि न्यायालय दोन्ही पातळ्यांवर अधोरेखित करणे.

या व्यापक आंदोलनाच्या न्यायालयीन टप्प्यावर नुटाने अत्यंत महत्त्वाची आणि जबाबदार भूमिका बजावली आहे. विविध प्रकरणांमध्ये कायदेशीर मार्गाचा अवलंब करून, शासन निर्णय, नियमावली, सेवाशर्ती आणि न्यायालयीन पूर्वनिर्णयांच्या आधारे जुनी पेन्शन योजनेचा दावा भक्कमपणे मांडण्यात आला. परिणामी, हा संघर्ष केवळ आंदोलनात्मक न राहता, कायदेशीर कसोटीवर आधारित आणि न्यायालयीन प्रक्रियेत प्रभावी ठरणारा ठरला आहे.

थोडक्यात सांगायचे झाले तर, हा ऐतिहासिक निर्णय एकच स्पष्ट संदेश देतो.संघटित संघर्षाशिवाय पर्याय नाही, न्यायालयीन लढ्याशिवाय मार्ग नाही आणि जुनी पेन्शन योजना ही कोणाची कृपा नसून शिक्षकांचा मूलभूत हक्क आहे.

# राजकीय 'कंठ' फुटला की स्क्रिप्ट वाचली?

## महायुतीतील वादाचा हा नेमका 'अंक' कोणाचा?





महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या विसंगतीचा कळस पाहायला मिळत आहे. कालपर्यंत जे सोबत होते, ते आज एकमेकांवर तुटून पडत आहेत आणि ज्यांच्यावर बोलणे टाळले जात होते, त्यांच्यावर अचानक जहरी टीका होऊ लागली आहे.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, नवी मुंबईचे दिग्गज नेते गणेश नाईक आणि शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे गुरुजी या तिघांनाही अचानक असा काही कंठ फुटला आहे की, त्यामुळे हिंदुत्ववादी शक्तींमध्येच ठिणगी पडली आहे की काय, अशी चर्चा आता गल्लीपासून दिल्लीपर्यंत रंगू लागली आहे. पण हा केवळ योगायोग आहे की एखादी 'वेल प्लॅन्ड' स्क्रिप्ट, याचा शोध घेणे आता गरजेचे झाले आहे.

**रवींद्र चव्हाणांची 'मुक्ताफळे' आणि भाजपला बसलेला फटका**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी महापालिका निवडणुकीच्या धामधुमीत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या स्मृतींबाबत जे वक्तव्य केले, त्याचे पडसाद लातूरमध्ये उमटले आणि भाजपला तिथे सत्तेपासून दूर राहावे लागले. मात्र, चव्हाणांची ही राजकीय 'बॅटिंग' इथेच थांबली नाही. कल्याण-डोंबिवलीच्या परिसरात त्यांनी स्वबळाचा अवाजवी आव आणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला डिवचण्याचा प्रयत्न केला.

याचा परिणाम असा झाला की, अंबरनाथमध्ये हातातोंडाशी आलेली सत्ता भाजपला गमवावी लागली आणि उल्हासनगरमध्ये शिंदे सेनेने भाजपला धूळ चारत बाजूला सारले. एमएमआर (टटफ) क्षेत्रात जिथे युती अभेद्य असणे गरजेचे होते, तिथे भाजपच्या या भूमिकेमुळे शिंदे सेनेचे नुकसान होण्याऐवजी भाजपचाच अधिक 'बँड' वाजला आहे.

**गणेश नाईक: 'पवार' संस्कार की भाजपची दमदाटी?**

दुसरीकडे, वनमंत्री गणेश नाईक यांनी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनाच संपवण्याची भाषा वापरली. नाईक हे मूळचे शिवसैनिक असले तरी, त्यांच्यावर झालेले शरद पवारांचे संस्कार अद्याप पुसले गेलेले नाहीत, हेच त्यांच्या विधानातून स्पष्ट झाले. भाजपने परवानगी दिली तर शिंदेंना संपवून टाकू, ही भाषा वापरताना नाईक विसरले की, ज्या शिंदेंनी स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले आणि केंद्राच्या पाठिंब्यावर राज्यभर यश मिळवले, त्यांच्यासमोर नाईक नवी मुंबईच्या पलीकडे झेप घेऊ शकले नाहीत.

नाईक यांना स्वतःची सत्ता वाचवण्यासाठी भाजपच्या वळचणीला जावे लागले, तर शिंदेंनी स्वतःचा ब्रँड उभा केला. त्यामुळे नाईक यांची ही दमदाटी म्हणजे केवळ 'रिकामी डरकाळी' ठरली आहे.

**भिडे गुरुजींचा अचानक झालेला 'साक्षात्कार'**

या सगळ्या नाट्यात सर्वात धक्कादायक एन्ट्री झाली ती संभाजी भिडे गुरुजींची. १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचे बिगुल वाजले आणि अचानक भिडे गुरुजींना शरद पवार हे देशद्रोही वाटू लागले. लवासा ही महाराष्ट्राला लागलेली कीड असल्याचा साक्षात्कारही त्यांना याच काळात झाला.

प्रश्न असा पडतो की, इतकी वर्षे गुरुजी शांत का होते? लवासा आणि पवारांचे राजकारण हे काही आजचे नाही. मग बरोबर निवडणुकीच्या तोंडावरच हा कंठ फुटण्यामागे ₹पाणी कुठेतरी मुरतेय₹ हे स्पष्ट दिसते.

**बँड वाजवण्याची 'मास्टर स्क्रिप्ट' कोणाची?**

हे सगळे नेते एकाच वेळी वेगवेगळ्या दिशांना का बोलत आहेत? यामागे एक मोठे राजकीय गणित असू शकते. महाराष्ट्रात 'ठाकरे' आणि 'पवार' हे दोन ब्रँड पूर्णपणे मोडीत काढणे सोपे नाही. काँग्रेसला रोखण्यासाठी या दोन ब्रँडचा वापर करणे किंवा त्यांच्यातच परस्पर वाद लावून देणे, ही रणनीती कोणाची असू शकते?

**पवार ब्रँडचा खेळ**

नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकांमध्ये शरद पवार आणि सुप्रिया सुळे सक्रिय दिसले नाहीत. केवळ अजित पवार मैदानात होते, पण त्यांनाही भाजपच्या स्थानिक नेत्यांनी पुण्यात रोखले. अशा वेळी राष्ट्रवादीचे अस्तित्व धोक्यात असताना काँग्रेसच्या आशा पल्लवीत होऊ नयेत, म्हणून कदाचित भिडे गुरुजींना 'बोलते' केले गेले नसेल ना?

**राजकीय सोयीचे राजकारण**

भिडे गुरुजी जेव्हा पवारांवर टीका करतात, तेव्हा राष्ट्रवादीचे कार्यकर्ते भडकणार आणि त्याचा भावनिक फायदा पुणे जिल्हा परिषदेत राष्ट्रवादीला मिळणार, हे गणित भाजपच्या चाणक्यांना समजत नसेल असे म्हणणे मूर्खपणाचे ठरेल. म्हणजेच, एका बाजूला टीका करायची आणि दुसऱ्या बाजूला त्या टीकेतून ठराविक पक्षाला फायदा मिळवून देऊन तिसऱ्याला (काँग्रेसला) रोखायचे, असा हा गुंतागुंतीचा खेळ असू शकतो.

एकूणच, रवींद्र चव्हाण, गणेश नाईक आणि संभाजी भिडे यांचे हे 'कंठ फुटणे' म्हणजे केवळ वैयक्तिक मते नसून, महाराष्ट्राच्या राजकारणात घडवून आणलेले एक 'नाट्य' आहे. या नाट्याचा पडदा जेव्हा पडेल, तेव्हा कोणाचे राजकीय अस्तित्व उरेल आणि कोणाचे संपेल, हे पाहणे रंजक ठरेल.

# जीवनदायिनी रेखा!





माजी सनदी अधिकारी इ. झेड. खोब्रागडे यांनी पत्नीवर कृतज्ञतापूर्वक लिहिलेले रेखा हे स्वकथन नुकतेच प्रकाशित झाले. महानगरीय पर्यावरणात वाढलेली रेखा मखमली पायघड्यांचा त्याग करीत एकनाथ खोब्रागडे नावाच्या तरुणासोबत जनमार्गावर निघून अहेरी - गडचिरोलीच्या अंधारवनात दुःखीतांवर आभाळमाया करीत परिवर्तनाचे नवे हुंकार फोडण्याच्या प्रकल्पांना कशी साथ देते याचे वास्तव लेखकाने या पुस्तकातून रेखाटले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील सावरी (बिडकर) हे इ. झेड. यांचे गाव. बाबा आमटेंच्या आनंद निकेतन महाविद्यालयात अनवाणी पायाने जाणारे एकनाथ पुढे कलेक्टर होऊन पिवळ्या दिव्याच्या गाडीत सन्मानपूर्वक बसले. अभावग्रस्त परीस्थितीशी लढत ते पदवीधर झाले.

प्रभा आत्याच्या घरी पाहुणपणाने आलेल्या मुंबईच्या रेखा या नाजूक, सुंदर, सुस्वभावी, शांत, शाळकरी पोरीने एकनाथच्या काळजावर आपले नाव अजाणतेपणे रेखाटले. मात्र यालाच प्रेम म्हणतात, हे काही कळले नव्हते. मी रेखाशी बोलू शकत नव्हतो. परंतु तिला बघत होतो, असा कबुलीजबाब लेखकाने दिला आहे. रेखाला यातील काहीही माहित नव्हते... ती ओळख कुठेतरी हृदयात राहून गेली. तिचा चेहरासुद्धा ! हे आपल्या प्रेमाचे लेखकाने व्यक्त केलेले गुपित रोमँटिक वाटते.

रेखाशी लग्न करण्यासाठी तिच्या लायक बनले पाहिजे. या सम्यक विचारातून लेखक मार्गस्थ झाले. नागपूर विद्यापीठात एम.एस्सी.चे शिक्षण, ऑर्डनन्स फॅक्टरी अंबाझरी, ओरिसातील चांदीपूर, ओएनजीसी देहरादून मध्ये नोकरी, पुढे ओएनजीसी मध्येच वर्ग १ साठी निवड, मुंबईमध्ये पोस्टिंग आणि या दरम्यान लेखकाने त्यांच्या या एकतर्फी प्रेमातून सात वर्षे केलेल्या पाठपुराव्याचे रेखाचित्र या पुस्तकातून चितारले आहे.

रेखाच्या वडिलांचे पत्र वाचून लेखकाच्या आनंदाला उधान येते. ह्णतिला मी आवडलो आणि एवढया काळात तिचे माझ्यावर प्रेम जडले असेलह्व, असा जणू ठरावच लेखकाच्या मनात त्यावेळी आयोजित विशेष सभेत पारित होतो. नागपुरात रेखा-एकनाथ यांचा मंगल परिणय सोहळा संपन्न झाला. लेखक आपल्या नववधूला वरोऱ्यावरून सावरीला बैलगाडीत बसवून घेऊन जातात. तेव्हा, हा प्रसंग वाचताना नादिया के पार चित्रपटातील कौन दिशा में लेके चला रे बटुहिया?.... हे सुमधूर गीत आठवते.

मुंबईत संसार सुरु झाला. यांना घरातले काही कळत नाही हे कळून चुकले होते. लेखक आपला सांसारिक अडाणीपणा अजिबात लपवत नाही. एकदा लेखकाचे वडील मुंबईला भेटीला आले. स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी कलेक्टर हो आणि समाजाची सेवा कर !

हे प्रवर्तनिय विचार वडिलांनी रेखाला समजावून सांगितले आणि तिने लेखकालाही समजावून सांगावे असे ठणकावले. निरक्षर पण शहाणे व बुद्धिमान असलेल्या वडिलांच्या डोक्यात आलेले विचार ही बाबासाहेबांच्या धम्मक्रांतीची फलनिष्पती आहे, असे लेखक अभिमानाने सांगतात. वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी खोब्रागडे एमपीएससी देतात.

परीक्षा दोघांची होती. पेपर लेखक देत असले तरी परीक्षेदरम्यान रेखाने रात्र-रात्र जागून लेखकाला साथ दिली. प्रोत्साहन दिले. इ. झेड., एमपीएससी उत्तीर्ण होत उपजिल्हाधिकारी झाले. रेखाने हे घडवून आणले, असे लेखकांनी प्रांजळपणे मांडले आहे.

उपजिल्हाधिकारी म्हणून निवड झाल्यानंतर रेखाने तिन अटी घातल्या. पहिली दारू प्यायची नाही, कुठलेही व्यसन करायचे नाही. दुसरी जमेल तेवढे लोकांसाठी प्रामाणिकपणे काम करायचे. तिसरी काम करतांना बेईमानी करायची नाही. कोणाकडून काही घ्यायचे नाही. भ्रष्टाचार अजिबात करायचा नाही. हा दोघांमधील अलिखित बॉंड इ. झेड. यांनी आयुष्यभर प्रामाणिकपणे पाळला.



**डॉ. महेंद्रकुमार मुरलीधर मेश्राम**
**२४, राजगृह, शंभूनगर,**
**कोराडी रोड, नागपूर.**
**९९७५६६५८६२**

देशातील सर्वच अधिकारी-कर्मचारी पती-पत्नीने याचे अनुकरण केले तर भ्रष्टाचारमुक्त भारत सारख्या आंदोलनाची व लोकपाल-लोकायुक्ताची सुद्धा गरज उरणार नाही. ह्या अटी मुर्दाडमनात दावाग्नी चेतविणारे समाजसुत्र ठरू शकतात.

प्रशिक्षण पूर्ण होताच पहिली नियमित पोस्टिंग गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी या नक्षलग्रस्त, अतिसंवेदनशील, दुर्गम व आदिवासी क्षेत्रात एसडीओ म्हणून झाली. बदली, पोस्टिंग, पद हा मुद्दा कुटुंबात चर्चेचा विषय होणार नाही हे रेखाने ठरवून टाकले होते.

लोकहिताचे प्रशासन सुरु झाले. शोषण होणार नाही याची काळजी घेतली. अडचणी व आवाहने खूप होती. कुटुंबाच्या मदतीशिवाय काम करणे कठीण होते. रेखाचे संपूर्ण लक्ष होते. रेखाने हिंमत दिली, मोकळीक दिली आणि मनोबलही वाढविले. रेखाच्या खंबीर सोबतीने लेखकाने प्रकाशयात्री होत घनघोर तमातून उजेडाकडे प्रवास आरंभला व अहेरी-गडचिरोली सारख्या अंधारकड्यावर नव्या उर्जायनाचा नवा इतिहास लिहिला.

अहेरीचे एक व्यावसायिक गृहस्थ दिवाळीच्या शुभेच्छा म्हणून घरी आले. दुसऱ्या दिवशी, सोफ्यावरील कुशन झटकताना रेखाला एक पाकीट दिसले. उघडून पहिले तर त्यात दहा हजार रुपये होते. दोघेही अस्वस्थ झाले. त्या गृहस्थाला घरी बोलावून विचारणा केली. ते गृहस्थ गडबडले. त्यांना लज्जित झाल्यासारखे वाटले. चेहऱ्यावरचे हावभाव बदलले. पाकीट हातात घेत म्हणाले, तुम्हाला ओळखण्यात माझ्याकडून चूक झाली.

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

# सेवानिवृत्तीनंतरही समाजाचा शिल्पकार : प्रल्हाद होगे पाटील

माणूस कितीही मोठा झाला, कितीही पदं भूषवली, तरी त्याच्या मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात गावाची ओढ कायम जिवंत असते. लहानपणीची माती, त्या मातीतील माणसं, बोलीभाषेचा गोडवा आणि ओळखीची नाती, या सगळ्यांची एक अदृश्य दोरी आयुष्यभर आपल्याला गावाकडे ओढत राहते. अनेकांच्या मनात एक सुप्त स्वप्न असतं, आपण गावासाठी काहीतरी उभं करावं, पंचक्रोशीसाठी काहीतरी देऊन जावं, आणि सेवानिवृत्तीनंतर तर गावाच्या गळ्यातलं ताईत बनावं.

हीच भावना मनाशी बाळगून एक सेवानिवृत्त अधिकारी पुन्हा आपल्या गावाकडे परततो. पण तो केवळ निवांत आयुष्य जगण्यासाठी नाही, तर गावाचं, पंचक्रोशीचं आणि त्या निमित्ताने अवघ्या महाराष्ट्राचं सामाजिक चित्र बदलण्यासाठी. त्या अधिकाऱ्याचं नाव आहे, प्रल्हाद होगे पाटील. त्यांनी महाराष्ट्राच्या विविध भागांत विविध जबाबदाऱ्या सांभाळत प्रशासकीय सेवेत आपला ठसा उमटवला. वेगवेगळ्या पदांवर कार्यरत असताना तळागाळातील माणसाला न्याय मिळावा, शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत गरजांपर्यंत सर्वसामान्यांचा पोहोच वाढावा, यासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला. छगन भुजबळ यांचे सचिव म्हणून काम करतानाही त्यांनी संवेदनशीलता आणि कार्यक्षमतेचा आदर्श निर्माण केला.

अवघ्या राज्यात गावपातळीवरचा विकास केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात दिसावा, यासाठी त्यांनी घेतलेले निर्णय आणि केलेली कामं आजही उदाहरण म्हणून सांगितली जातात. अनेक विकासाभिमुख योजनांचे शिल्पकार म्हणून प्रल्हाद होगे पाटील यांच्याकडे पाहिलं जातं. अधिकारी असताना त्यांनी सामाजिक कारणे, नव्या उपाययोजना आणि दूरदृष्टीने आखलेल्या प्रयोगांसाठी आपली ऊर्जा झोकून दिली.

सेवानिवृत्तीनंतर अनेक जण शांत आयुष्याची वाट निवडतात. पण प्रल्हाद होगे पाटील यांनी सेवानिवृत्तीला विश्रांती न मानता, नव्या सामाजिक प्रवासाची सुरुवात मानली. परभणी जिल्ह्यातील त्यांच्या झरी या गावी परतण्याचा निर्णय घेतल्यानंतर मागील चार वर्षांत त्यांनी एक क्षणही शांत बसणं स्वीकारलं नाही.

मराठवाड्यातील मागास भागांमध्ये जाऊन त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. शेतीतील नव्या प्रयोगांची माहिती दिली, प्रशिक्षण दिलं आणि शेतकऱ्यांना आत्मविश्वास दिला. झरी हे गाव केंद्रबिंदू न ठेवता त्यांनी महाराष्ट्रातील अनेक खेड्यांमध्ये शेतीविषयक प्रयोग यशस्वी कसे करता येतील, यासाठी मार्गदर्शन केलं. पाटील यांचे काम झरी ते मराठवाडा आणि पूर्ण महाराष्ट्र असे पोहचले आहे.

प्रल्हाद पाटील यांनी सुरुवात स्वतःच्या शेतापासून केली. फळबाग लागवड, विषमुक्त शेती, पर्यावरणाचा समतोल राखणारी शेती, या सगळ्या बाबींवर त्यांनी विशेष भर दिला. त्यांच्या शेतातील प्रयोगांची चर्चा लवकरच पंचक्रोशीबाहेर पोहोचली. अनेक शेतकरी हे प्रयोग पाहण्यासाठी झरीला येऊ लागले.

एक प्रयोग, मग दुसरा, आणि अशा अनेक प्रयोगांतून त्यांनी हे सिद्ध केलं की कमी जमिनीतही दर्जेदार उत्पादन घेता येतं. नैसर्गिक आपत्ती, कर्ज आणि अपयशाच्या छायेत वावरणारा शेतकरी त्यांच्या मार्गदर्शनामुळे पुन्हा उभा राहू लागला. शेती केवळ पोट भरण्याचं साधन न राहता, सन्मानाचं आणि आत्मविश्वासाचं क्षेत्र बनू लागली.

पण पाटील इथेच थांबले नाहीत. उत्तम शेतीसोबत उत्तम पिढी घडणं आवश्यक आहे, हा विचार त्यांनी केंद्रस्थानी ठेवला. आजूबाजूच्या पंचक्रोशीतील लोकांना त्यांनी सातत्याने सांगितले. मुलांना शिक्षणाकडे वळवा. विशेषतः मुलांच्या भाषा, शब्दलेखन आणि आकलनक्षमता वाढवण्यावर त्यांनी भर दिला. केवळ मार्गदर्शन करून न थांबता, प्रत्यक्ष त्या पद्धतीचं शिक्षण देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला.

अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची वाट दाखवताना त्यांनी आर्थिक, मानसिक आणि नैतिक आधार दिला. वारंवार अपयश आलेल्या, दिशाहीन झालेल्या विद्यार्थ्यांना समुपदेशन करून पुन्हा उभं केलं. दहावी-बारावीच्या मुलांना गाव सोडायची भीती वाटते, हे ओळखून त्यांनी त्या मुलांचं समुपदेशन केलं, त्यांना बाहेरचं जग दाखवलं. एकदा जगाची ओळख झाली की, त्यांच्या आवडी-निवडींना नवी दिशा मिळाली.



जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षणाचा दर्जा सुधारावा, यासाठी त्यांनी सातत्याने शाळांना भेटी दिल्या. विविध प्रयोग राबवले, ज्यामुळे त्या शाळेत शिकणाऱ्या मुलांना आपली शाळा आपलीच आहे अशी भावना निर्माण झाली. गाव आणि परिसरात सतत विकास व्हावा यासाठी पाटील यांनी घेतलेली भूमिका एक इतिहास झाली आहे.





mahasagarngp@gmail.com

प्रल्हाद पाटील ठामपणे सांगतात, शेतकरी आमचा राजा आहे. पण या राजाला केवळ गौरवाच्या शब्दांनी नाही, तर योग्य दिशादर्शनाने, काळानुरूप बदल स्वीकारण्यास मदत करून साथ द्यावी लागते. सततच्या नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकरी खचतो; अशा वेळी त्याच्या पाठीशी उभं राहणं ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. तेच सेम तरुणाईच्या बाबतीत आहे. त्यांना आधार आणि दिशा दिली तरच समाजाला दिशा मिळेल.

पाटील यांनी ही जबाबदारी केवळ शब्दांत नाही, तर कृतीतून निभावली. या सामाजिक प्रवासात पाटील यांच्या पत्नी चंदा पाटील यांचीही भूमिका तितकीच महत्त्वाची आहे. त्यांनाही सामाजिक कार्याची प्रचंड आवड असून, नवनवे उपक्रम राबवण्याची त्यांची सततची धडपड असते. हीच संवेदनशीलता आणि सामाजिक जाणीव त्यांच्या मुलगा-मुलगी यांच्यातही उतरलेली दिसते.


जेव्हा सामाजिक कार्याचा वसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातो, तेव्हा तो केवळ उपक्रम राहत नाही, तो इतिहास घडवतो. प्रल्हाद होगे पाटील यांचा दीर्घ प्रवास हा समाजसेवेच्या मुकुटाला नवे तेज देणारा आहे. त्यांनी शेतीसाठी केलेलं काम, शिक्षणासाठी घेतलेला पुढाकार, आणि माणुसकीच्या आधारावर उभं केलेलं सामाजिक जाळं, हे सारं पिढ्यान्पिढ्या स्मरणात राहील. एक सुशिक्षित, अनुभवी माणूस समाजासाठी काय निर्माण करू शकतो आणि ती निर्मिती शेकडो वर्षे टिकू शकते, याचं जिवंत उदाहरण म्हणजे प्रल्हाद होगे पाटील.

समाजासाठी अखंड लढत राहणाऱ्यांमध्ये त्यांचं नाव इतिहासात अग्रक्रमाने घेतलं जाईल, याबद्दल कोणतीही शंका नाही. त्यांनी झरी मराठवाडा, राज्य एवढे सिमीत राहता अजून पुढे भारतभर भरारी घ्यावी. त्यांचा आदर्श घेऊन अनेकांनी पुढाकार घ्यावा. पाटील यांना पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.

-----------

**प्रल्हाद होगे पाटील संपर्क क्रमांक**
**9867917660**

# भारतावर नवं संकट खतरनाक निपाह व्हायरसची एन्ट्री





भारतावर आणखी एक नवं संकट ओढवले आहे. खतरनाक निपाह व्हायरसने भारतात एन्ट्री केली आहे. पश्चिम बंगालमध्ये निपाह विषाणूचे दोन रुग्ण आढळले आहेत. या दोन्ही रुग्णांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे. केंद्र सरकारने या घटनेची दखल घेत राष्ट्रीय संयुक्त उद्रेक प्रतिसाद पथक बंगालमध्ये पाठवले आहे. बंगालमध्ये रुग्ण आढळल्यानंतर आता इतर राज्यांमध्येही या विषाणूचा धोका वाढला आहे. हा विषाणू नेमका काय आहे? तो किती घातक आहे? याची लक्षणे काय आहेत याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

लेडी हार्डिंग हॉस्पिटलमधील औषध विभागातील डॉ. घोटेकर यांनी निपाह विषाणूबद्दल माहिती दिली आहे. डॉ. घोटेकर म्हणाले की, हा विषाणू प्रामुख्याने फळे खाणाऱ्या वटवाघळांमध्ये आढळतो आणि तेथून मानवांमध्ये किंवा प्राण्यांमध्ये पसरतो. संक्रमित वटवाघूळाने खालेले फळ जर एखाद्या व्यक्तीने खाल्ले तर हा विषाणू मानवांमध्ये पसरतो. एकदा संसर्ग झाल्यानंतर हा विषाणू दुसऱ्या व्यक्तीमध्ये संक्रमित होतो. अशाप्रकारे याचा प्रसार होतो.

डॉ. घोटेकर यांनी सांगितले की, निपाह विषाणू इतर विषाणूंपेक्षा जास्त धोकादायक आहे. या विषाणूचा मृत्युदर ४० ते ७५ टक्के इतका असू शकतो. हा विषाणू मेंदूवर लवकर हल्ला करतो, यामुळे रुग्ण कोमातही जाऊ शकतो. त्यामुळे त्याचा जीव वाचणे कठीण होते.

या विषाणूसाठी अद्याप कोणतेही औषध किंवा लस विकसित झालेली नाही, त्यामुळे धोका आणखी वाढतो. हा विषाणू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये देखील पसरू शकतो, त्यामुळे तो वेगाने पसरू शकतो. त्यामुळे लोकांना या विषाणूच्या लक्षणांबाबत माहिती असणे आवश्यक आहे.

**निपाह विषाणूची लक्षणे**

तीव्र डोकेदुखी, ताप, उलट्या आणि चक्कर येणे, घसा खवखवणे, लोक बेशुद्ध पडू शकतात.

**या विषाणूला कसे रोखायचे?**

फणस खाणे टाळा, लक्षणे दिसल्यास ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा, संक्रमित रुग्णांपासून दूर रहा आणि मास्क वापरा, ज्या भागात विषाणूची प्रकरणे नोंदवली गेली आहेत अशा ठिकाणी प्रवास करणे टाळा.

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



# राज तंत्र

'उद्दीष्ट 'साध्य करण्या
ते बदलती धोरणांची दिशा
बहुमताने सत्ता मिळविणे
ही असते त्यांची मनिषा..

साम दाम दंड भेद नितीचा
करोनी यथोचित वापर
पक्षबळ वाढविणे साठी
ते असती सदैव तत्पर..

करू नका केवळ काव काव
द्राक्ष हाताला लागत नाही
म्हणून आंबट आहे म्हणती
हे जगाला आहे ठाव ..!




# वेदना नसल्या तरी हृदयविकार

सध्याच्या बदलत्या जीवनशैलीत दीर्घकालीन आजार होण्याचं प्रमाण वाढलं आहे. मधुमेह, कॅन्सर, उच्च रक्तदाब आणि हृदयविकाराच्या झटक्यांचं प्रमाण वाढलं आहे. यातही आजकाल तरुण-तरुणींमध्ये हे आजार होण्याचं प्रमाण पूर्वीपेक्षा खूप जास्त वाढलं आहे. अशीच एक घटना मध्यंतरी दिल्लीमध्ये घडली. या घटनेत ३६ वर्षांच्या एका महिलेला हार्ट अटॅक आला. यामागे एक महत्त्वाच कारण म्हणजे तिने काही सौम्य वाटणारी लक्षणं दुर्लक्षित केली.

त्या महिलेचा दिवस साध्या थकव्याने सुरू झाला नाही, तर शरीर पूर्णपणे गळून गेल्यासारखं वाटत होतं. हातांमध्ये जडपणा जाणवत होता आणि थकवा असह्य वाटत होता; मात्र अनेकांप्रमाणे तिनेही याला मानसिक ताण किंवा कामाचा परिणाम समजून दुर्लक्ष केलं. दुपारपर्यंत तिला सतत मळमळ जाणवू लागली. उलटी होत नव्हती, ताप नव्हता आणि पोटाच्या त्रासाचीही कोणतीच ठोस लक्षणं नव्हती. थोड्याच वेळात श्वास घेताना अडचण जाणवू लागली, श्वास कमी किंवा उथळ आणि वेगळा वाटत होता. ती बसून आराम करण्याचा प्रयत्न करत होती, पण मनात कोणतंही दडपण आल्यासारखं वाटत नव्हतं. कारण अशा लक्षणांना सहसा हार्ट अटॅकशी जोडलं जात नाही, पण जवळपास आठ तासांनंतर तिला अचानक कार्डियाक अरेस्ट आला.

**आरोग्य चर्चा**

**या पॅटर्नचा अर्थ काय?**

ही अवस्था 'एटिपिकल मायोकार्डियल इस्केमिया' म्हणून ओळखली जाते. या प्रकारच्या हृदयविकाराच्या झटक्यात छातीत तीव्र वेदना किंवा दडपण जाणवत नाही. त्याऐवजी दम लागणे, मळमळ, मान किंवा पाठीमध्ये वेदना, असामान्य थकवा, पोटात अस्वस्थता किंवा एकंदर बेचैनी अशी लक्षणे दिसू शकतात. हा प्रकार महिलांमध्ये जास्त प्रमाणात दिसून येतो आणि हा जास्त धोकादायक असतो कारण तो 'शांत' असतो. छातीत तीव्र वेदना नसल्यामुळे अनेकजण याला ॲसिडिटी, ताणतणाव किंवा झोपेची कमतरता समजून दुर्लक्ष करतात.



### या लक्षणांकडे कधीही दुर्लक्ष करू नका

- नेहमीपेक्षा वेगळा, सतत जाणवणारा थकवा
- कोणतेही जास्त कष्ट न करता दम लागणे
- मळमळ, अपचन किंवा पोटाच्या वरच्या भागात अस्वस्थता
- हात, खांदे, मान, जबडा किंवा पाठीमध्ये जडपणा किंवा वेदना
- अचानक थंड घाम येणे
- चक्कर येणे, भोवळ येण्याची भावना

# थॅलेसेमियाच्या रुग्णांना दिलासा

भारतात थॅलेसेमिया मोठ्या संख्येने मुलांना प्रभावित करतो. भारताला थॅलेसेमियाची राजधानी म्हणून ओळखले जाते. दरवर्षी अंदाजे दहा ते बारा हजार मुले गंभीर थॅलेसेमियासह जन्माला येतात.

थॅलेसेमिया हा एक जन्मजात रक्त विकार आहे. त्यात शरीर योग्य प्रमाणात हिमोग्लोबिन तयार करत नाही. हिमोग्लोबिन हे लाल रक्तपेशींमध्ये असलेले एक प्रथिन आहे. ते संपूर्ण शरीरात ऑक्सिजन पुरवते. थॅलेसेमियामुळे पुरेसा ऑक्सिजन महत्वाच्या अवयवांना आणि ऊतींना पोहोचू शकत नाही. त्यामुळे अशक्तपणा, सुस्ती, चक्कर येणे आणि फिकट त्वचा यासारखी लक्षणे दिसून येतात. या आजारामुळे अशक्तपणादेखील होऊ शकतो. थॅलेसेमियाच्या गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्यांसाठी दिलासादायक बातमी आली आहे. अमेरिकेच्या अन्न आणि औषध

**आशेचा किरण**

प्रशासनाने या आजाराच्या उपचारासाठी जगातील पहिल्या पोटात घेण्याच्या औषधाला मान्यता दिली आहे.

मिटापिव्हॅट हे औषध काय आहे?

थॅलेसेमिया या धोकादायक आजाराशी लढण्यासाठी मंजूर झालेले हे नवीन पोटात घेण्याचे औषध मिटापिव्हॅट आहे. ते अॅक्वेस्मे या ब्रँड नावाने विकले जाईल. हे औषध अल्फा-थॅलेसेमिया आणि बीटा-थॅलेसेमिया दोन्ही असलेल्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी वापरले जाऊ शकते. आतापर्यंत थॅलेसेमियाच्या रुग्णांना उपचारांसाठी दरमहा वेदनादायक



रक्त संक्रमण करावे लागत होते. तथापि, आता हे रुग्ण गोळीच्या स्वरूपात औषध घेऊ शकतात. अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने मंजूर केलेले हे औषध थॅलेसेमियाच्या रुग्णांसाठी फायदेशीर ठरू शकते. कारण ते अंतर्गत लाल रक्तपेशींना बळकटी देते आणि शरीराच्या पेशींना ऊर्जा प्रदान करते. हे लाल रक्तपेशींना लवकर नष्ट होण्यापासून रोखते आणि त्यांना जास्त काळ जगण्यास मदत करते. हे औषध शरीरात हिमोग्लोबिनची पातळी वाढविण्यासदेखील मदत करू शकते.

# दुर्लक्ष पडेल महागात

बदलत्या जीवनशैलीमुळे, वाढत्या स्क्रीन टाइममुळे आणि ताणतणावामुळे, बरेच लोक डोळे आणि कपाळ दुखण्याची तक्रार करत आहेत. ही वेदना कधीकधी सौम्य असते. कधीकधी इतकी तीव्र असू शकते, की ती दैनंदिन कामे गुंतागुंतीची करू शकते. काही लोकांना सकाळी उठल्याबरोबर वेदना जाणवतात, तर काहींना त्यांचा मोबाईल फोन किंवा लॅपटॉप बराच वेळ पाहिल्यानंतर. लोक सहसा त्याकडे दुर्लक्ष करतात. त्यांना तो केवळ थकवा वाटतो, परंतु सतत वेदना ही अंतर्निहित स्थितीचे लक्षण असू शकते. डोळे आणि कपाळ दुखणे विविध आजारांशी संबंधित असू शकते. ते लवकर ओळखणे आवश्यक आहे. डोळे आणि कपाळ दुखण्याचे सर्वात

**आरोग्यमंत्र**


सामान्य कारण सायनस समस्या असू शकते. सायनसमध्ये जळजळ किंवा संसर्गामुळे कपाळावर, नाकाच्या तळाशी आणि डोळ्यांभोवती जडपणा आणि दाबासारखा वेदना होऊ शकतात. मायग्रेन हेदेखील एक प्रमुख कारण आहे. त्यामुळे डोळ्यांमध्ये तीव्र वेदना, मळमळ, उलट्या आणि तेजस्वी प्रकाशामुळे अस्वस्थता येऊ शकते. याव्यतिरिक्त, डोळ्यांची कमजोरी, चुकीचा चष्मा किंवा दीर्घकाळ स्क्रीन वेळेमुळे डोळ्यांवर ताण येणेदेखील ही वेदना वाढवू शकते.

काही प्रकरणांमध्ये उच्च रक्तदाब, निर्जलीकरण आणि जास्त ताण यामुळे डोळे आणि कपाळात सतत वेदना होऊ शकतात. झोपेचा अभाव डोळ्यांची जळजळ, जडपणा आणि डोकेदुखीसह ही समस्या वाढवू शकतो.

मोबाईल फोन, लॅपटॉप किंवा टीव्हीचा दीर्घकाळ वापर केल्यानंतर ही वेदना अनेकदा वाढते. सायनसच्या रुग्णांना सकाळी जास्त वेदना होऊ शकतात. ताणतणाव, झोपेचा अभाव आणि तेजस्वी सूर्यप्रकाशामुळेदेखील वेदना वाढू शकतात. हे विशेषतः मुले, वृद्ध आणि आधीच मायग्रेन किंवा डोळ्यांच्या समस्यांनी ग्रस्त असलेल्यांसाठी धोकादायक असू शकते. वेदनांसोबत अंधुक दृष्टी, उलट्या, उच्च ताप किंवा डोळ्यांना सूज येत असेल तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्वाचे आहे.

ते कसे टाळावे ?

- डिहायड्रेशन टाळण्यासाठी दररोज भरपूर पाणी प्या.
- जास्त स्क्रीन टाइम टाळा आणि डोळ्यांना वारंवार विश्रांती द्या.
- योग्य प्रिस्क्रिप्शनसह चष्मा घाला आणि नियमितपणे डोळे तपासा.
- थंडी, धूळ आणि प्रदूषणापासून सावधगिरी बाळगा. जर तुम्हाला सायनसची समस्या असेल, तर जास्त काळजी घ्या.
- पुरेशी झोप घ्या आणि ताण कमी करण्यासाठी योग किंवा ध्यान करा.



# प्रतिमेची चिंता बनली मानसिक समस्या

भारतीय तरुणांमध्ये शारीरिक प्रतिमेची चिंता ही एक धोकादायक मानसिक आरोग्य समस्या बनत आहे. ही समस्या केवळ जास्त वजन असलेल्या तरुणांपुरती मर्यादित नाही, तर कमी वजनाचे तरुणदेखील अशाच मानसिक ताणाचा अनुभव घेत आहेत. 'एम्स-आयसीएमआर'च्या एका अभ्यासातून असे दिसून आले आहे, की शरीराच्या वजनाच्या दोन्ही टोकावरील तरुणांची लक्षणीय संख्या शरीराच्या प्रतिमेशी संबंधित मानसिक त्रासाने ग्रस्त आहे.

'जर्नल ऑफ एज्युकेशन अँड हेल्थ प्रमोशन'मध्ये प्रकाशित झालेल्या या संशोधनात एम्स ओपीडीमध्ये उपचार घेणाऱ्या १८ ते ३० वयोगटातील १,०७१ तरुणांचा समावेश होता. संशोधनानुसार, ४९ टक्के लठ्ठ आणि ४७ टक्के कमी वजनाच्या तरुणांनी मध्यम ते गंभीर पातळीच्या शारीरिक प्रतिमेच्या ताणाची तक्रार नोंदवली. सामान्य किंवा जास्त वजन असलेल्या तरुणांमध्ये ही संख्या अंदाजे ३६ टक्के होती. या अभ्यासात समाविष्ट असलेल्या तरुणांपैकी, अंदाजे २५ टक्के लठ्ठ आणि ११ टक्के कमी वजनाचे होते. यातील बहुतेक सहभागी विद्यार्थी आणि मध्यमवर्गीय होते.

**संशोधन**

आकडेवारीनुसार, कमी वजनाच्या तरुणांना सामान्य वजनाच्या व्यक्तींपेक्षा शरीराच्या प्रतिमेची चिंता होण्याची शक्यता जवळजवळ दुप्पट होती आणि लठ्ठ तरुणांना ती अनुभवण्याची शक्यता जवळजवळ तिप्पट होती.

तज्ज्ञांच्या मते, वजन व्यवस्थापन मानसिक आरोग्याशी खोलवर जोडलेले आहे, म्हणून भावनिक समस्यांकडे दुर्लक्ष केले गेले तर तरुण जीवनशैली कार्यक्रम मध्येच सोडून देतात. या संशोधनाचे नेतृत्व करणाऱ्या तज्ज्ञांच्या मते, बरेच तरुण मोठ्या उत्साहाने वजन कमी करण्याचे कार्यक्रम सुरू करतात; परंतु अभ्यासाचा दबाव, शरीराच्या प्रतिमेशी संबंधित ताण आणि मानसिक थकवा हळूहळू त्यांची आवड कमी करतो. यामुळे वजन व्यवस्थापन फक्त कॅलरी मोजण्यापुरते मर्यादित असलेल्या राष्ट्रीय मानसिकतेबद्दल प्रश्न निर्माण होतात.



वजनानुसार ताणाचे स्वरूप बदलते

संशोधनात असेही दिसून आले, की जास्त वजन असलेल्या तरुणांना आत्मविश्वास आणि आत्म-शंकेचा अभाव जाणवत होता. कमी वजन असलेल्या तरुणांना ताण, एकटेपणा आणि लाजिरवाणेपणाच्या भावना जास्त जाणवत होत्या. एकूणच, अर्ध्याहून अधिक तरुणांना त्यांच्या वजनाबद्दल सतत जाणीव असते, तीनपैकी एकाने आत्मविश्वास कमी केल्याचा अनुभव घेतला आहे आणि चारपैकी एकाने स्वतःला दोषी ठरवल्याचे वाटते. संशोधकांचे म्हणणे आहे, की वजनाबाबत सामाजिक टोमणे, कलंक आणि अवास्तव सौंदर्य मानके या मानसिक दबावाला आणखी वाढवत आहेत. संशोधनात असा इशारा देण्यात आला आहे, की भारताचे सार्वजनिक आरोग्य धोरण लठ्ठपणावर जास्त केंद्रित आहे, तर कमी वजनाच्या तरुणांच्या मानसिक आरोग्य समस्यांकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही.

# दुर्मिळ आजार

गेल्या काही वर्षांत, विविध प्रकारचे आजार उदयास आले आहेत. दुर्मिळ आजार सामान्य लोकसंख्येतील फार कमी लोकांना होतात. यापैकी अनेक आजारांवर अजूनही निश्चित उपचार नाहीत. या दुर्मिळ आजारांचे निदान आणि उपचार करणे अत्यंत कठीण आहे. अनेक प्रकरणांमध्ये हे आजार प्राणघातक ठरू शकतात. 'आरपीआय'ची कमतरता हा जगातील सर्वात दुर्मिळ आजार मानला जातो. हा आजार शरीरात एका प्रमुख एंझाइमच्या कमतरतेमुळे होतो. त्यामुळे स्नायू कडक होणे, झटके येणे आणि मेंदूच्या पांढऱ्या पदार्थाचे नुकसान होऊ शकते. या आजाराचा आतापर्यंत फक्त एकच रुग्ण आढळला आहे, जो १९८४ मध्ये ओळखला गेला होता. 'फील्ड्स डिसीज' हा एक 'न्यूरोमस्क्युलर' आजार आहे. त्यात जुळ्या बहिणींमध्ये आतापर्यंत फक्त दोनच रुग्ण आढळले आहेत. या आजारात स्नायू हळूहळू कमकुवत होतात. वैद्यकीय तज्ज्ञ अजूनही या आजारावर संशोधन करत आहेत. 'हचिन्सन-गिल्फोर्ड प्रोजेरिया सिंड्रोम' या आजारामुळे मुलांमध्ये अकाली वृद्धत्व येते. दोन वर्षांपर्यंतची मुलेही वृद्ध दिसू शकतात.



**व्याधी विकार**

सुरकुत्या पडणे, डोळे फुगणे आणि केस गळणे ही मुख्य लक्षणे आहेत. हा आजार अत्यंत दुर्मिळ आहे आणि सध्या त्यावर कोणताही इलाज नाही. 'मेथेमग्लोबिनेमिया' या आजारामुळे रक्त निळे दिसते. शरीरात विशिष्ट प्रकारच्या हिमोग्लोबिनची पातळी वाढल्याने त्वचा, ओठ आणि नखे निळे होतात. ॲक्वाजेनिक अर्टिकेरिया अन्नाची ॲलर्जी सामान्य आहे, परंतु पाण्याची ॲलर्जी अत्यंत दुर्मिळ आहे. पाण्याच्या संपर्कात आल्यावर या आजारामुळे त्वचेवर खाज सुटते आणि लाल पुरळ उठते. या आजाराने ग्रस्त असलेल्या लोकांना घाम, पाऊस आणि बर्फाची ॲलर्जीदेखील असू शकते. 'फॉरेन ॲक्सेंट सिंड्रोम'मध्ये व्यक्ती अचानक त्यांची सामान्य भाषा वेगळ्या उच्चारात बोलू लागते. मेंदूला झालेल्या दुखापतीनंतर ही स्थिती अनेकदा उद्भवते. त्यामुळे बोलण्यावर परिणाम होतो. 'स्टोन मॅन डिसीज' या अत्यंत दुर्मिळ स्थितीत, स्नायू हळूहळू हाडांमध्ये बदलतात. कालांतराने, व्यक्तीचे शरीर कडक होते. तथापि, हृदय, जीभ आणि डोळ्यांच्या स्नायूंवर परिणाम होत नाही.

## उच्च रक्तदाबावर आयुर्वेदिक उपचार

आयुर्वेदानुसार वात आणि पित्त या दोषांचं असंतुलन उच्च रक्तदाबाला कारणीभूत ठरतं. या वैद्यकशास्त्रात उच्च रक्तदाबाला 'रक्त कफ वृद्धी' असं म्हणतात. या दोन्ही दोषांचं असंतुलन दूर करून रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यावर आयुर्वेदाचा भर असतो. अनेकदा कफाच्या असंतुलनामुळेही हा विकार जडतो. उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यात बऱ्याच वनौषधी महत्त्वाची भूमिका बजावतात. विविध विकारांवरील उपचारांसाठी गोक्षुराचा वापर केला जातो. हेच औषध उच्च रक्तदाबाच्या समस्येवरही गुणकारी ठरतं. सर्पगंधा ही वनौषधीही मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. गुलकंद शरीर तसंच मेंदूला थंडावा देतं. याच्या सेवनाने मूड चांगला होतो शिवाय ताणतणाव दूर होतो. व्याधीनिवारणार्थ आहारातल्या बदलांवरही आयुर्वेदाचा भर दिसून येतो. दोषांच्या संतुलनासाठी योग्य आहार गरजेचा असल्याने उच्च रक्तादाबाच्या रूग्णांनी पथ्यपाणी सांभाळावं. शाकाहाराने उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवता येतो. पार्सेली, कारलं, लसूण यांचा आहारात समावेश हवा. केळं, कलिंगड, पेरू आणि द्राक्ष ही फळं खायला हवी. पनीर, तूप आणि दुधाचं सेवन वाढवणं हा सुद्धा यावरचा प्रभावी उपाय आहे. कॅफेनमुळे रक्तदाब वाढत असल्यामुळे ते शक्यतो टाळावं. मीठ, डाळी आणि कडधान्यांचं प्रमाणही कमी हवं. लाल मांस आणि अंडी पूर्णपणे वर्ज्य करायला हवी. नियमित व्यायाम, योगा, मेडिटेशन यामुळे आराम मिळतो.



# का येते खाज?

प्रूरिटिस हा खाजेसाठीचा वैद्यकीय शब्द आहे. 'अंग खाजवण्याची तीव्र इच्छा' असं याचं वर्णन करता येईल. अशाप्रकारची खाज वैतागवाणी आणि अस्वस्थ करणारी ठरू शकते. तीव्र स्वरूपाच्या खाजेमुळे निद्रानाश, चिंता आणि नैराश्य आदी समस्या निर्माण होऊ शकतात. तज्ज्ञांच्या मते त्वचेतल्या नसा हिस्टामाईनसारख्या विशिष्ट प्रकारच्या रसायनांना प्रतिसाद देतात आणि हा संदेश मेंदूपर्यंत पोहोचवला जातो. प्रूरिटिस हे एखाद्या त्वचाविकाराचं लक्षण असतं किंवा विकाराचा संकेतही असू शकतो. बरेचदा ते अंतर्गत प्रक्रियेचं प्रगटीकरणही असू शकतं. त्वचाविकार किंवा इतर कोणत्याची विकारांचं निदान न झालेल्या रुग्णांमध्ये मज्जासंस्थेतल्या खाजेच्या जाणिवेच्या चुकीच्या प्रक्रियेमुळे ही समस्या निर्माण होऊ शकते. बऱ्याच त्वचाविकारांमध्ये पुरळ आणि खाज हे मुख्य लक्षण असतं. काही विकारांमध्ये पुरळ येत नाही तर फक्त खाज सुटते. प्रौढांची त्वचा कोरडी पडत असल्याने तीव्र स्वरूपाची खाज सुटू शकते. अशा वेळी पुरळ येतंच असं नाही.



शरीरातला अंतर्गत बिघाडही खाजेला कारणीभूत ठरू शकतो. किडनी निकामी झाल्यास अशाप्रकारे खाज येते. 'हेपीटायटिस सी'सह यकृताशी संबंधित काही विकारांमुळेही प्रूरिटिसचा त्रास होतो तसंच थायरॉइडमध्येही ही समस्या निर्माण होते. ॲनिमिया, मल्टीपल मायेलोमासारख्या रक्तविकारांमध्येही शरीराला खाज सुटू शकते. मेंदूशी संबंधित समस्याही खाज निर्माण करू शकतात. क्वचित प्रसंगी लिंफोमाचा संबंधही खाजेशी जोडला जातो.


**आरोग्य वेध**

उपचार - सर्वात प्रथम त्वचेची तपासणी केली जाते. रक्तचाचणी किंवा बायोप्सीद्वारे नेमका आजार जाणून घेतला जातो. विशिष्ट प्रकारच्या त्वचाविकारामुळे खाज येत असेल तर योग्य उपचारांनंतर ही समस्या दूर होते. काही वेळा खाज घालवण्यासाठी अल्ट्राव्हायोलेट लाईट उपचार दिले जातात. हा त्रास असताना गरम पाण्याची आंघोळ पूर्णपणे टाळायला हवी. हलके आणि ढगळ कपडे घातल्याने तसंच शक्य तितक्या थंड वातावरणात राहिल्याने खाजेची समस्या कमी होण्यास मदत होते. शक्यतो सौम्य साबणाचा वापर करावा. मऊ टॉवेलने आणि हलक्या हाताने अंग पुसावं. त्वचा कोरडी पडू नये यासाठी मॉईश्चरायझिंग क्रीम किंवा लोशन लावावं. प्रूरिटिस हा काहीसा अस्वस्थ करणारा विकार असला तरी तो उपचारांना चांगला प्रतिसाद देतो हे लक्षात ठेवावं.

## चेहरा धुताना...

चेहरा धुणं ही अत्यंत साधी वाटणारी क्रिया आहे. पण आपण त्यातही बऱ्याच चुका करतो. जवळपास प्रत्येक जण चुकीच्या पद्धतीने चेहरा धुतो, त्वचेची नीट काळजी घेत नाही असं तज्ज्ञ सांगतात.

पण काही चुका टाळल्या तर त्वचा मुलायम आणि टवटवीत राहू शकते.



* झोपण्याआधी मेक अप काढून टाका. त्वचेलाही श्वास घ्यायचा असतो हे लक्षात ठेवा. मेक अप तसाच ठेवला तर त्वचेच्या समस्या उद्भवतात.

* रसायनयुक्त साबण त्वचेतला नैसर्गिक ओलावा काढून घेतो. यामुळे त्वचा निस्तेज दिसते. हे टाळण्यासाठी सौम्य साबण किंवा फेसवॉशचा वापर करा. रसायनयुक्त उत्पादनं टाळा. * गरम पाण्याऐवजी कोमट पाण्याचा वापर करा. गरम पाण्यामुळे त्वचेचं नुकसान होतं. * चेहरा धुताना बोटांचा वापर करा. तळव्याने चेहरा धुतल्याने त्वचेवर पुरळ उठू शकतं. बोटं चेहऱ्यावरून वर्तुळाकार फिरवा. एक ते दोन मिनिटं ही कृती करा. * कोणत्याही उत्पादनाचा अतिवापर करू नका. फेसवॉश प्रमाणातच घ्या. * बरेचदा चेहरा पुसण्यासाठी अंग पुसण्याचा टॉवेल वापरला जातो. पण यामुळे शरीरावरचे बॅक्टेरिया चेहऱ्यावर पसरू शकतात. म्हणूनच चेहरा पुसण्यासाठी मऊ फेस नॅपकीन किंवा स्वच्छ रूमाल वापरा. * चेहरा जास्त वेळा धुतल्याने त्वचा कोरडी पडते. * आठड्यातून एक किंवा दोन वेळाच स्क्रबरचा वापर करा.

## भाजपच्या शहर सुधारकडे
# मनपाचे बहुमत

**काँग्रेस आणि वंचितचे स्वप्न भंगले**

■ **महासागर प्रतिनिधी**
**अकोला, दि. २७ :**
महापालिका निवडणुकीच्या निकालात त्रिशंकू स्थिती निर्माण झाल्यानंतर भाजपच्या पुढाकारातून ४४ नगरसेवकांच्या शहर सुधार आघाडी नावाने गट स्थापन केला आहे.

या गटातील नगरसेवकांनी मंगळवारी अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयात हजेरी लावली. त्यानंतर विभागीय आयुक्तांनी गटाला मान्यता दिली आहे. भाजपला सत्तेसाठी राष्ट्रवादी शरद पवार गट, राष्ट्रवादी अजित पवार गट व शिवसेना शिंदे गटाची साथ मिळाली. शरद पवारांच्या राष्ट्रवादीची निर्णायक भूमिका राहिली असून ॲड. प्रकाश आंबेडकरांसह काँग्रेसच्या मनपातील सत्तेच्या स्वप्नांवर त्यांनी पाणी फेरले आहे.

महापालिकेची निवडणूक अटीतटीची झाली. अकोलेकरांनी कुठल्याही एका पक्षाला बहुमत दिले नाही. त्यामुळे सत्तास्थापनाची उत्सुकता लागली होती. सत्ता समीकरण जुळवण्यासाठी ८० पैकी ४१ नगरसेवकांच्या पाठिंब्याची गरज आहे. भाजप सर्वात मोठा पक्ष असून त्यांचे ३८ नगरसेवक आहेत.

राष्ट्रवादी अजित पवार गट आणि महानगर विकास समिती प्रत्येकी एक धरून ८० पैकी ४० जागा युतीच्या निवडून आल्या आहेत. काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट, वंचित बहुजन आघाडी, ह्यएआयएमआयएमह्, राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना शिंदे गट व अपक्ष यांचे देखील एकूण ४० नगरसेवक विजयी झाले. बहुमताचा भाजपला सुरुवातीपासूनच विश्वास होता.

दुसरीकडे भाजपला सत्तेच्या बाहेर ठेवण्यासाठी इतर पक्षांसोबत बोलणी करून समीकरण जुळवण्याची काँग्रेसने धडपड केली. कुठलेही पद न घेता इतरांना पाठिंबा देण्याची तयारी काँग्रेसने दाखवली. सर्व विरोधी पक्षांच्या नेत्यांनी भाजपला रोखण्यासाठी ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वात मोट बांधली. महापौर पदाचा उमेदवार जाहीर करण्याची भूमिका सुद्धा त्यांनी घेतली होती. मात्र, भाजपने शहर सुधार आघाडी नावाने ४४ नगरसेवकांचा गट स्थापन स्थापन करून विरोधकांचे प्रयत्न उधळून लावले.

विशेष म्हणजे विरोधकांच्या बैठकीला हजेरी लावणारे राष्ट्रवादी शरद पवार गट, राष्ट्रवादी अजित पवार गट आणि महानगर विकास समितीच्या नगरसेवकांचा भाजपच्या नेतृत्वातील गटात समावेश आहे. गटनेता म्हणून युवा नगरसेवक पवन महल्ले यांच्यावर जबाबदारी दिली. विभागीय आयुक्त कार्यालयात आज आघाडीतील सर्व नगरसेवक उपस्थित होते. पडताळणी झाल्यानंतर विभागीय आयुक्तांनी गटाला मान्यता दिली.

# एक लाख आदिवासी महिलांना जीवन विमाचे कवच

**कै. लक्ष्मणराव मानकर ट्रस्टच्यावतिने साकार होणार उपक्रम : केंद्रीय मंत्री गडकरी यांचा निर्धार**



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**
आदिवासी व ग्रामीण समाजाच्या शिक्षणासोबतच आरोग्य सुरक्षिततेला ठोस बळ देण्यासाठी कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्था अधिक गतीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने काम करणार असून प्रबोधन, प्रशिक्षण, सकारात्मकपणे मूल्यसंवर्धन करण्यासाठी आमचे प्रयत्न राहणार आहेत; सेवा टेक लिमिटेडच्या सहकार्याने एकल विद्यालयाच्या शिक्षक-पर्यवेक्षकांना व्हिसा कार्ड देण्यामागे आदिवासी क्षेत्रात आर्थिक परिवर्तनाची नांदी आहे, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेअंतर्गत २०२६ परिवर्तन रोडमॅप नुकताच संस्थेच्या विशेष बैठकीत अध्यक्ष अतुल शिरोडकर यांच्याकडून सादर करण्यात आला.

या रोडमॅपमध्ये आरोग्य, शिक्षण, मनोरंजन आणि आर्थिक कल्याण यांचा समन्वय साधत आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाची स्पष्ट दिशा मांडण्यात आली. या वेळी डॉ. उपेंद्र कोठेकर, राजीव हडप, डॉ. राजीव पोतदार, आमदार संजय पुराम, सुधीर दिवे, मिलिंद कानडे, अनिल जोशी, बाळ अंजनकर, रेखाताई मावसकर, संस्थेचे सचिव प्रशांत बोपर्डीकर यांच्यासह कार्यकारिणी सदस्य आणि पर्यवेक्षक उपस्थित होते.

कै. लक्ष्मणराव मानकर संस्थेच्या भविष्यातील योजनामध्ये सर्वात महत्त्वाचा आणि सामाजिकदृष्ट्या प्रभावी घटक म्हणजे एक लाख आदिवासी महिलांसाठी जाहीर करण्यात आलेली जीवन विमा योजना. आदिवासी कुटुंबांमध्ये महिलांची भूमिका केंद्रस्थानी असून, त्यांच्या सुरक्षिततेमुळे संपूर्ण कुटुंबाचा आर्थिक कणा मजबूत होतो. आजारपण किंवा अकाली मृत्यूच्या प्रसंगी कुटुंबावर येणाऱ्या आर्थिक संकटातून त्यांना सावरण्यास ही योजना मोठा आधार देणार आहे. पहिल्या टप्प्यात संस्थेतील ३३ हजार विद्यार्थ्यांच्या मातांना विमा सुरक्षा या योजनेतर्गत देण्यात येणार आहे. ही योजना केवळ विमा संरक्षणापुरती मर्यादित नसून, आदिवासी महिलांच्या आत्मसन्मान, स्थैर्य आणि सुरक्षित भविष्यासाठीचा विश्वास निर्माण करणारी आहे. सामाजिक सुरक्षा योजनांचा थेट लाभ महिलांपर्यंत पोहोचवण्याचा मानकर ट्रस्टचा हा प्रयत्न प्रशंसनीय ठरत आहे.

यावसंगी बोलताना नितीन गडकरी यांनी आदिवासी क्षेत्रात शिक्षणासह आरोग्य सुविधा उत्तम रीतीने पुरविण्याची नितांत गरज असल्याचे सांगून समाजाने संवेदनशीलपणे याकडे जबाबदारीने बघितले पाहिजे, असे आवर्जून सांगितले. महाराष्ट्रातील एक लाख आदिवासी महिलांसाठी जीवन विमा योजना संस्थेने यावेळी जाहीर केली. आजार, अपघात अथवा आकस्मिक परिस्थितीत कुटुंबावर येणारा आर्थिक भार कमी करण्याच्या दृष्टीने ही योजना मैलाचा दगड ठरणार असून, सामाजिक सुरक्षिततेच्या दिशेने हा एक निर्णायक टप्पा मानला जात आहे.

आरोग्य उपक्रमांचा कणा ठरणारा मेडिसर्व्ह डिजिटल हेल्थ प्लॅटफॉर्म खास आदिवासी लाभार्थ्यांसाठी संस्थेकडून विकसित करण्यात आला आहे.

या ॲपद्वारे कुटुंबांच्या इलेक्ट्रॉनिक आरोग्य नोंदी, गावपातळीवरील आरोग्य माहिती, आजारांचे लवकर निदान आणि योग्य रुग्णालयात रेफरल सुविधा उपलब्ध होणार आहेत. कमी इंटरनेट उपलब्धतेच्या दुर्गम भागातही हा ॲप प्रभावीपणे कार्य करेल.

शिक्षण, मनोरंजन आणि आर्थिक सुरक्षिततेचा समन्वय राखण्यात येणार असून, शिक्षण क्षेत्रात अभ्यासक्रम मानकीकरण, शिक्षकांसाठी संरचित देखरेख प्रणाली तसेच टाटा स्टीलच्या सहकार्याने व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येणार आहेत. नागपूर येथे KISS संस्थेच्या सहकार्याने आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्याच्या दिशेनेही पावले उचलण्यात येत आहेत. याशिवाय एकल इंटरटेंमेंट थिएटर्स सुरू करून मनोरंजनासोबत आरोग्य, स्वच्छता आणि सामाजिक जाणीव याविषयी जनजागृती केली जाणार आहे.

धापेवाडा येथे पार पडलेल्या या बैठकीतच सेवा नीती कार्ड योजनेचा शुभारंभ श्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्डवर रुपये १ एक लाखांचा वैयक्तिक अपघात विमा, सामान्य रुग्णालयात प्रतिदिन ५००, आयसीयूमध्ये प्रतिदिन १००० रोख लाभ (कमाल ३० दिवस), हवामानाधारित पॅरामेट्रिक विमा लाभ, औषधे व तपासण्यांवर ५% कॅशबॅक, शेती इनपुट्सवर ६०% पर्यंत सवलत असे अनेक लाभ देण्यात येणार आहेत.

सेवा टेक लिमिटेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रितू सोनी यावेळी म्हणाल्या, ह्मानकर ट्रस्टसोबत भागीदारी करून ग्रामीण व आदिवासी समुदायांसाठी उपयुक्त सेवा आणि लाभ उपलब्ध करून देताना आनंद होत आहे.

मानकर ट्रस्टच्या सक्रिय सहभागामुळेच हा उपक्रम शक्य झाला आहे. या उपक्रमासाठी व्हिसा इंटरनॅशनल, पाइन लॅब्स लिमिटेड, एक्सपेरिटस इन्शुरन्स ब्रोकर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि क्यूबी हेल्थ टेक्नॉलॉजीज यांचेही रितू सोनी यांनी आभार मानले. डिजिटल परिवर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या वैयक्तिक आणि आर्थिक विकासासाठी उपयुक्त ठरणारे लाभ देणे ह उद्दिष्ट असल्याचेही त्या म्हणाल्या.

मानकर ट्रस्टचे अध्यक्ष अतुल शिरोडकर यांनी ट्रस्टच्या २० वर्षांच्या कार्याचा आढावा घेत, २०२६ परिवर्तन रोडमॅप हा आरोग्य, शिक्षण आणि आर्थिक सुरक्षिततेचा एकसंध आराखडा असल्याचे स्पष्ट केले.

## भीम आर्मी जिल्हाध्यक्षांचा जिल्हा परिषदेत आत्मदहनाचा प्रयत्न

■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २७ :**
भीम आमीर्चे जिल्हाध्यक्ष प्रदीप कांबळे यांनी अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याने जिल्हा परिषद परिसरात एकच खळबळ उडाली. जिल्हा परिषद कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ हा धक्कादायक प्रकार घडल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. वेळेत पोलिसांनी जमेची बाजू घेतली.

स्वावलंबी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका रत्नमाला मेंढे यांच्यावर झालेल्या कथित अन्यायाच्या निषेधार्थ प्रदीप कांबळे यांनी हे टोकाचे पाऊल उचलण्याचा प्रयत्न केल्याचे समजते. जिल्हा परिषद शिक्षण विभागाने पर्यवेक्षक पदाला मान्यता देऊन वेतन काढण्यासाची जबाबदारी होती.

पण माज्यावर अन्याय केला असल्याचा आरोप रत्नमाला मेंढे यांनी केला असून, याविरोधात गेल्या आठवडाभरापासून शिक्षण विभागासमोर आंदोलन सुरू होते. यापूर्वीही प्रशासनाला इशारा देण्यात आला होता, मात्र त्याची दखल घेतली गेली नाही, असा आरोप आंदोलनकर्त्यांचा आहे.

कांबळे यांनी अंगावर डिझेल ओतत आत्मदहनाचा प्रयत्न करताच उपस्थित पोलिस व कर्मचाऱ्यांनी तातडीने त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. यावेळी कांबळे आणि पोलिसांमध्ये झटापटही झाली.



■ ***नागपूर :*** *सोलार ग्रुपचे संस्थापक सत्यनारायण नुवाल यांना यंदाचा पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सत्यनारायण नूवाल यांच्या नागपूर येथील निवासस्थानी भेट देऊन त्यांचे अभिनंदन केले. तसेच त्यांच्या कार्याबद्दल माहिती जाणून घेतली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, लिलादेवी नुवाल, मनीष नुवाल, राघव नुवाल आदी उपस्थित होते.*

## : फिट्सचा त्रास : कारणे, लक्षणे आणि उपाय

**लोकरोग्य**



अनेकदा काही व्यक्ती या चालता बोलता अचानक कोसळतात आणि त्यांच्या तोंडातून फेस बाहेर पडू लागतो. त्यानंतर अचानक काही काळातच ती व्यक्ती शुद्ध हरपून बेशुद्ध देखील पडते. अशा प्रकारे फिट आल्यानंतर नेमके काय उपचार करायचे याबाबत जनसामान्य अनभिज्ञ असतात. मुळात फिट का येते? फिट येण्यामागची कारण नेमकी काय आहेत? लक्षण काय जाणवतात? आणि फिट या आजरावर उपचार काय आहेत? या संदर्भात डॉ. महेश बरामदे यांच्याशी बातचीत.

**फीट येणे म्हणजे कोणता आजार आहे?**

○ फिट येणे या त्रासाला एपिलेप्सी असे शास्त्रीय नाव आहे. मेंदूच्या कार्यात बिघाड झाल्यास या आजाराचे लक्षण दिसून येते. माणसाच्या मेंदूमध्ये बारा हजार कोटी पेशींचा एक समूह असतो. या पेशींचे एकमेकांत सतत चलनवलन सुरू असते. या चलनवलनाचे स्वरूप विद्युत रासायनिक पद्धतीचे असते. हे चलनवलन एका लयीत सुरू असते. काही कारणाने ती लय विस्कळीत होते आणि त्याचा परिणाम म्हणून तीव्रतेने विजेचा ताण मेंदूत पसरतो. तो जेथे जातो तेथील पेशी विघटित होऊ लागतात.

मेंदू पेशीत जे काही घडते त्याची प्रतिक्रिया शरीरावर दिसू लागते. काही काळापुरते शरीरात बदल दिसतात. काहीवेळा वागणुकीत फरक पडल्याचे दिसून येते. भीती, क्रोध, चिंता यासारख्या भावना अनुभवास येऊ शकतात. काही व्यक्तींना शरीरात कुठलीतरी संवेदना जाणवू लागते. असा बदल होण्याचे कारण मात्र समजत नाही. अनेकदा फिट आल्यानंतर काही काळात रुग्ण बेशुध्द देखील होतो.

**फिट येण्यामागची कारण काय आहेत?**

○ काही वेळा मानसिक ताणतणाव, इतर शारीरिक आजार, आहारातील त्रुटी किंवा मद्यपान यांसारखीही कारणे दिसतात.

या आजारामध्ये दहा टक्के रुग्ण विशिष्ट प्रकारची धोक्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते. अशा स्थितीला शास्त्रीय भाषेत स्टेट्स एपिलेप्सी असे म्हणतात.

या स्थितीमध्ये एका मागोमाग एक फिट्स येत राहतात. दोन झटक्यांमध्ये रुग्ण नेहमीसारखा सामन्य राहत नाही. अशी स्थिती काही वेळा प्राणघातक ठरू शकते. प्रत्येक रुग्णाच्या तक्रारीचे स्वरूप वेगवेगळे असते आणि फिट्सचे वेगवेगळे प्रकारही दिसू शकतात.

**फिट येतानाची लक्षणं काय जाणवतात?**

○ काही रुग्णांना शरीराच्या एखाद्या भागात मुंग्या आल्या आहेत, इतका छोटा फरक जाणवतो. दुसऱ्या टोकाला हाता-पायांना जोर जोरात झटके येतात. म्हणूनच हा त्रास नेमका कशाने झाला आहे हे शोधून मगच त्यावर प्रभावी इलाज करता येतो. काही रुग्णांना त्रास होण्याआधी सूचना मिळते. त्याला ऑरा असे म्हणतात. याचा आजाराचे निदान करण्यास चांगला उपयोग होतो.

शास्त्रानुसार एपिलेप्सीचे दोन प्रकार मानले जातात. पहिल्या प्रकारात संपूर्ण शरीरावर एपिलेप्सीचा परिणाम दिसून येतो. त्याला जनरलाईज्ड एपिलेप्सी, तर दुसऱ्या भागात मेंदूच्या विशिष्ट भागापुरताच त्रास होतो याला पार्शल किंवा फोकल एपिलेप्सी म्हणतात.

फिटच्या वर्णनावरून जनरलाइज्ड एपिलेप्सिचे काही प्रकार मानले गेले आहेत. त्यावरून उपचारही ठरविले जातात. वेगवेगळ्या काही तपासण्यांमुळे निदान करायला पुष्टी मिळते.

एपिलेप्सीचा नेहमी अढळणारा प्रकार म्हणजे ग्रँड माल सिझर्स. हा फ्रेंच शब्द असून, त्याचा अर्थ मोठा आजार असा होतो. रुग्णाला आपल्या पोटात खड्डा पडत आहे आणि आता फिट येणार असे काही सेकंद जाणवते. यानंतर त्याच्या तोंडातून मोठा आवाज बाहेर पडतो. त्यानंतर संपूर्ण शरीराचे स्नायू ताठरतात. हात, पाय, पाठ कडक होते.

**या आजारावर काय उपचार आहेत?**

○ फिट येण्याच्या प्रत्येक प्रकारावर चांगले औषध उपलब्ध आहेत; मात्र योग्यवेळी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेऊन त्यांच्य सल्ल्यानुसार औषधोपचार घेऊन सल्ल्याप्रमाणे नियम पाळावेत. या रुग्णांनी जागरणे टाळावीत, टीव्हीपुढे सिनेमा पाहणे टाळावे, चहा- कॉफीसारखी उत्तेजक पेये टाळावीत, जास्त थकवा येईल अशी कामे करू नयेत. पुरेशी विश्रांती घ्यावी. अशा प्रकारे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली योग्य उपचार करून घेतले तर हा आजार नियंत्रणात ठेवता येतो.

■ ■ ■

## मंत्री पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करा
### सपकाळ यांची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २७ :**
जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत विरोधी पक्षावर दबाव टाकणारे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर निवडणूक आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करावा, पाटील यांना निवडणूक प्रचारसभा घेण्यास प्रतिबंध करण्यात यावा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीत विरोधकांचा टिकाव लागणार नाही. त्यामुळे वेळ आणि पैसा कशाला वाया घालवता. अर्ज मागे घ्या, असे विधान चंद्रकांत पाटील यांनी सांगली जिल्ह्यातील एका सार्वजनिक कार्यक्रमात केले आहे. या विधानावरून सपकाळ यांनी निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांना पत्र लिहून चंद्रकांत पाटील यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे.



■ ***अमरावती :*** *अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे खासगी सचिव जनार्दनपंत बोथे गुरुजी यांना केंद्र सरकारचा अत्यंत मानाचा पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे विद्यार्थी, प्रभावी वक्ते, पत्रकार शुभम बायस्कार यांनी बोथे गुरुजींचे गुरुकुंज मोझरी येथील आश्रमात सदिच्छा भेट घेत आशीर्वाद घेतले. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिष्टचिंतन हे केले. बोथे गुरुजी यांचा हा सन्मान म्हणजे केवळ व्यक्तीचा नव्हे, तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा, त्यांच्या सेवाव्रताचा आणि राष्ट्रनिर्माणाच्या मूल्यांचा सन्मान आहे. ग्रामस्वराज्य, सेवा, संस्कार आणि राष्ट्रभक्तीचा वारसा अधिक बळकट करणारा हा क्षण प्रेरणादायी आहे, असे मत यावेळी त्यांनी नोंदवले. त्या निमित्ताने गुरुदेवांच्या विचारांना नमन. सेवेच्या कायार्ला सलाम असेही ते म्हणाले.*

## मानवी केसांच्या पुनरुत्पादनाचे भविष्य वनस्पती-आधारित एक्सोसोम्स




एका नवीन वैज्ञानिक समीक्षेनुसार, आले, द्राक्षे आणि ब्लूबेरी सारख्या स्त्रोतांपासून मिळवलेले लहान पेशीय संदेशवाहक असलेले वनस्पती-आधारित एक्सोसोम्स मानवी केसांच्या पुनरुत्पादनातील पुढील महत्त्वाचा टप्पा ठरू शकतात.

इंडियन जर्नल ऑफ डमेटीलॉजीमध्ये प्रकाशित झालेल्या या अभ्यासानुसार, वनस्पती-व्युत्पन्न एक्सोसोम्सना बायोमिमेटिक पॉलीपेप्टाइड्ससोबत जोडल्यास अधिक सुसंगत, जैविकदृष्ट्या मजबूत केसांच्या पुनर्संचयनाचे परिणाम मिळतात, जे एकाच यंत्रणेवर अवलंबून असलेल्या पूर्वीच्या उपचारांपेक्षा वेगळे आहे. एकाच संकेताला लक्ष्य करण्याऐवजी अनेक पुनरुत्पादक मार्गांवर कार्य केल्यामुळे, केसांच्या पुनरुत्पादनाच्या विकसित होत असलेल्या क्षेत्रात या दृष्टिकोनाला एक महत्त्वपूर्ण शोध म्हणून पाहिले जात आहे.

वर्षानुवर्षे, केस गळतीच्या उपचारांनी मर्यादित परिणाम दिले आहेत किंवा काही तडजोडी कराव्या लागल्या आहेत, असे QR678® च्या वैद्यकीय व्यवहार विभागाच्या प्रमुख डॉ. राजी पाटील म्हणाल्या. हे संशोधन या गोष्टीवर जोर देते की केस गळती मृत केसांच्या मुळांमुळे होत नाही, तर विस्कळीत आण्विक संकेतांमुळे होते. अनेक पुनरुत्पादक मार्गांवर एकत्रितपणे कार्य केल्याने, आपण केस गळतीच्या केवळ दृश्यमान लक्षणांना कमी करण्याऐवजी केसांच्या वाढीचे जीवशास्त्र पुनर्संचयित करण्याच्या जवळ पोहोचतो. या समीक्षेमध्ये, प्रकाशित प्रीक्लिनिकल संशोधन, सुरुवातीचे क्लिनिकल अभ्यास आणि यांत्रिक डेटा वापरून वनस्पती-आधारित एक्सोसोम्स आणि बायोमिमेटिक पॉलीपेप्टाइड्स एकत्र येऊन केसांचे चांगले पुनरुत्पादन कसे साधतात हे स्पष्ट केले आहे.

■ ■ ■

## ओळख वैद्यक उपकरणांची
# एक्स रे

क्ष-किरण हे जलद, वेदनारहित आणि मोठ्या प्रमाणावर वापरले जाणारे इमेजिंग तंत्र आहे जे डॉक्टरांना तुमच्या शरीराचे आतील भाग पाहण्यास मदत करते. हाडे, ऊती आणि अवयवांचे मूल्यांकन करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधातील सर्वात सामान्यपणे केल्या जाणाऱ्या निदान चाचण्यांपैकी एक आहे.



थोड्या प्रमाणात आयनीकरण रेडिएशन वापरून, क्ष-किरण तपशीलवार प्रतिमा तयार करतात जे विविध वैद्यकीय परिस्थितींचे निदान आणि निरीक्षण करण्यात मदत करतात. एक्स-रे ही डायग्नोस्टिक इमेजिंग चाचणी आहे जी शरीराच्या आतील रचनांच्या प्रतिमा तयार करण्यासाठी इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन वापरते.

क्ष-किरण शरीरातून जातात आणि विविध ऊतकांद्वारे वेगळ्या पद्धतीने शोषले जातात. क्ष-किरण चित्रपटांवर हाडांसारखी दाट रचना पांढरी दिसते, तर मऊ उती राखाडी रंगात दिसतात. फ्रॅक्चर, संक्रमण, असामान्यता आणि वैद्यकीय स्थितींचे परीक्षण करण्यासाठी मूल्यांकन करण्यासाठी एक्स रे चा वापर होतो. यामध्ये तुटलेली हाडे, सांधे निखळणे किंवा मऊ ऊतकांच्या दुखापतींचे मूल्यांकन करण्यासाठी.,न्यूमोनिया, ब्रॉंकायटिस किंवा फुफ्फुसाचा कर्करोग यासारख्या परिस्थितींचे निदान करण्यासाठी, पोटातील विकृती शोधणे, संधिवात, ऑस्टिओपोरोसिस किंवा हृदयाशी संबंधित समस्यांसारख्या परिस्थितींचे निरीक्षण करण्यासाठी या तंत्राचा वापर होतो. ■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# गायिका अंजली भारतींचे आक्षेपार्ह वक्तव्य



**भाजपचा आक्रमक पवित्रा सर्वच स्तरातून निषेध**

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**
भंडारा येथे आयोजित एका गायनाच्या कार्यक्रमात गायिका अंजली भारती यांनी बलात्कार विषयावर भाष्य करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्याबद्दल अत्यंत निंदनीय आणि आक्षेपार्ह भाषा वापरली.

या विधानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर भाजपने यावर तीव्र आक्षेप घेतला आहे. विशेष म्हणजे, विरोध पक्षाच्या नेत्यांनीही अंजली भारतींच्या या विधानाचे समर्थन करता येणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

भंडारा येथे सार्वजनिक कार्यक्रमात अंजली भारती यांच्या गायनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. यावेळी बोलताना अंजली भारती राज्यभरात वाढणाऱ्या बलात्काराच्या घटनांवर संताप व्यक्त करत, टीकास्त्र सोडले. जो बलात्कार करतो त्याचं डोकं, मान कापा.. असं आवाहन अंजली यांनी केलंह्न एवढंच नाही तर, जो कोणी बलात्काऱ्याचे डोकं, मान कापून आणेल त्याला माझी अर्धा संपत्ती देईन आणि ५० लाख रुपये देईल अशी घोषणा देखील त्यांनी केली.

मात्र, अंजली भारती हिने मिसेस मुख्यमंत्री अमृता फडणवीस यांच्याबद्दल अत्यंत खालच्या भाषेत वक्तव्य केले. अत्याचार आणि बलात्कारावर बोलत असताना, कारण नसताना अंजलीने अमृता फडणवीस यांना खेचले.

दरम्यान, या प्रकाराचा सर्वत्र निषेध केला जात आहे. भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांनी या घटनेवर संताप व्यक्त करत अंजली भारती आणि आयोजकांवर कडक कारवाईची मागणी केली आहे. त्या म्हणाल्या, श्रद्धेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या फोटोसमोर उभे राहून मुख्यमंत्र्यांच्या पत्नीवर बलात्कार करण्याची चिथावणी देणे आणि त्यावर टाळ्या पडणे, हे समाजाच्या अधःपतनाचे भयावह चित्र आहे. मात्र, आमच्याकडे बाबासाहेबांनी दिलेले संविधानाचे शस्त्र आहे. कायदेशीर प्रहार कसा करायचा, ते आम्हाला चांगलेच ठाऊक आहे.

**संजय राऊतांकडूनही निषेध**

खासदार संजय राऊत यांनीही या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली असून अंजली भारती यांच्या विधानाचे समर्थन करण्यास नकार दिला आहे. राऊत म्हणाले, मी ते वक्तव्य ऐकले नाही, पण जर कुणी एखाद्या महिलेविषयी, विशेषतः मुख्यमंत्र्यांच्या पत्नीविषयी असे बोलले असेल, तर त्याचे समर्थन करता येणार नाही. अमृता फडणवीस या स्वतः एक कलाकार आहेत, संगीत क्षेत्रात त्यांचा नावलौकिक आहे. त्यांच्यावर अशाप्रकारे वक्तव्य निषेधार्ह आहे.

ठाकरे गटाच्या नेत्या आणि मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनीही अंजली भारती हिच्या वक्तव्याचा निषेध केला आहे. अमृता फडणवीस जी यांच्याबद्दल अतिशय गलिच्छ भाषेत गायिका अंजली भारती यांनी जे वक्तव्य केलेले आहे, त्या वक्तव्यांचा निषेध करते असे पेडणेकर यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

गायिका अंजली भारती यांच्या आक्षेपार्ह विधानामुळे भाजप कार्यकर्ते राज्यभर आक्रमक झाले असून विविध पोलिस ठाण्यांमध्ये तक्रारी दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.



या प्रकरणावर विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला असून, ही भाषा संविधानाच्या चौकटीत बसणारी नाही, अशा शब्दांत संबंधित गायिकेचा समाचार घेतला आहे.

त्या म्हणाल्या की, संबंधित कार्यक्रमाचे आयोजक आणि वक्ते या दोघांचीही ही जबाबदारी आहे की सामाजिक भान राखले जावे. अमृता फडणवीस या सार्वजनिक जीवनातील महिला आहेत. मुळात कोणत्याही महिलेबद्दल दुसऱ्या महिलेने अशा प्रकारची अमानवी भाषा वापरणे हा मानवी अधिकारांचा भंग आहे. अशा विधानांमुळे समाजात महिलांवरील हिंसाचाराला अप्रत्यक्षपणे खतपाणी घातले जाते, ही बाब अधिक चिंताजनक आहे.